प्राप्त् झाला. ज्यांना असंख्यात देव वंदन करतात, ज्यांनी संपूर्ण ज्ञानावरण, दर्शनावर, मोहनीय, अंतराय, वगैरे आत्मगुणांचा घात करणाऱ्या कर्माचा नाश करून जिनेंद्रपद प्राप्त करून घेतले हेच इंद्रादिकाकडून वंद्य झाले, अशा देवाधिदेवाच्या चरणांचे पूजन संपूर्ण दु:खाचा नाश करणारे आहे व इंद्रियांच्या इच्छेचा नाश करून मोक्षारूपी कामना पूर्म करणारे आहे. म्हणून अन्य देवांची आराधना सोडून जिवेश्वराची आराधना करावी.

पुष्कळ काल रागी द्वेषी, मोही जीवांची आराधन करून भयंकर कर्मबंधन करून संसारात परिभ्रमण केले. त्या ऐवजी वीतराग सर्वज्ञाचेआराधन केले असते तर कर्माचा नाश होऊन मोक्षारूप अक्षाय्य सुख प्राप्त झाले असते. सर्व दु:खाचा नाश जिनपूजनाने होतो म्हणून ते करणे अवश्य आहे.

शंका - अर्हंत लोकाच्या अग्रभागी (मोक्षास्थानी) जाऊन राहिले ते धातुपाषाणाच्या स्थापना केलेल्या प्रतिबिंबात कसे येतील( व त्यांना आपले पूजन स्तवन व्हावे अशी इच्छा तरी कशी असणार( ते आपल्या अनंत ज्ञान व अनंत सुखात मग्न झालेले आहेत. जो कषायाने व्याप्त असेल, ज्याला आपली पूजा व्हावी असे वाटत असते तोच आपली कोणी स्तुती केली असता संतुष्ट होतो. तो संसारी असून रागद्वेषयुक्त असतो, त्यालाच पूजा आवडते. वीतराग भगवंतपरमेष्ठी अनंतचतुष्टयात लीन असल्याने त्यांना पूजेची इच्छा नाही. ते धातुपाषाणाच्या मूर्तीत येत नाहीत, कोणावर उपकार किंवा अपकार करीत नाहीत, आपले पुजन-स्तवन करणाऱ्यावर संतुष्ट होत नाहीत, निंदा करणाऱ्यावर द्वेष करीत नाहीत, अशा अवस्थेत भगवंताचे पूजन कां करावे(

समाधान - भगवंताला आपल्या पूजेची, स्तुतीची मुळीचं इच्छा नाही हे खरे आहे. पण गृहस्थाचे परिणाम सदैव शुद्ध आत्म्याचे चिंतन करण्यात स्थिर राहात नाहीत व साम्यभावातही राहात नाहीत. गृहस्थाचे मन निरालंब राहू शकत नाही. परमात्मभावनेच्या अवलंबनाने वीतराग स्वरुपाचे ध्यान व्हावे म्हणून, शुद्धात्माचे अवलंबन करण्याकरिता, विषयकषायाचे अवलंबन सोडून धातुपाषाणाच्या ्रतिबिंबामध्ये साक्षाात परमागम स्वरूपाचा संकल्प करून त्यांचे ध्यान व पूजन करणे अवश्य आहे. त्यावेळी विषयकषायांच्या संकल्पाचा अभाव असतो म्हणून दुर्ध्यान होत नाही व परिणाम शुद्ध होतात. परिणाम-विशुद्धतेच्या प्रभावाने अशुभ कर्माचा रस सुकून जातो, त्याची स्थिती व अनुभाग कमी होतो, अर्था् पापकर्म नाहीसे होते. याशिवाय परिणाम शुद्ध झाले असता शुभ प्रकृतीतील रस वाढतो व आयुकर्माशिवाय इतर कर्मांच्या प्रकृतीची स्थिती कमी होत

जाते. म्हणूनच वीतरागप्रभूच्या स्तवन-पूजन-ध्यानाच्या प्रभावाने पापाचा नाश होऊन सातिशय पुण्यकर्माचे उपार्जन होते.

पुण्यपाप बंधाचे कारण आपलेच परिणाम आहेत. बाह्यत: जसे ्वलंबून असेल तसेच आपले परिणाम होत असतात. यद्यपि भगवंत अरहंत धातुपाषाणाच्या प्रतिबिंबात येत नाहीत व ते स्व: कोणाचा अपकार-उपकार करीत नाहीत, तरी वीतराग परमात्म्याचे ध्यान-पूजन हे आपले परिणाम शुद्ध करणअयाचे आणि रागद्वेषाचा नाश करण्याचे बाह्य कारण आहे. त्यामुळे जीवावर मोठा उपकार होतो. जसे काष्ठपाषाणाच्या स्त्रीच्या चित्राला पाहून अंत:करणात प्रीती उत्पन्न होते, अथवा अचेतन अशा सुवर्णमणि, माणिक बागबगीचे, महाल, शहर, पाषाण, वगैरे पदार्थांच्या पाहण्याने व श्रवण करण्याने रागद्वेष उत्पन्न होतात, त्याचप्रमाण शुभाशुभ वचन, राग, रुदन, सुगंध, दुर्गंध ही सर्व अचेतन पुद्गल द्रव्ये असून त्यांचे श्रवण, अवलोकन, चिंतन, अनुभवन करणयाने रागद्वेश उत्पन्न होतात, त्याप्रमाणेच जिनेंद्राची परमशांत मुद्रा ज्ञानी पुरुषाला वीतरागता उत्पन्न करण्यास सहकारी कारण होते. ती प्रेरक कारण होत नाही. भव्य जीवांना वीतरागतेशिवाय दुसऱ्या कशाचीही इच्छा नसते. जिनेंद्राच्या चरणांची पूजा करण्यात जलचंदनादि अष्टद्रव्ये असावी लागतात. ती भगवंताला भक्षण करण्याकरिता नव्हेत. अथवा पूजा न केली तर अपूज्य राहतील म्हणून नव्हेत. अथवा ्यांच्या इच्छेकरिता म्हणून चढवावी लागत नाहीत. अष्टद्रव्यांचे समर्पण हे भगवंताला पाहून पूजकाला अतिशय आनंद झाला म्हणून जलचंदनाच्या मिषाने अर्घ्यावतरण आहे. जसे राजाला भेटण्यास गेले असता त्याला नजराणा करणे अथवा त्याला पाहून संतोष झाला असता त्यावर आरती ओवाळणे, अक्षतपुष्पादिकांची वृष्टी करणे, मोत्यांची माळ भरून ओवाळणे, सोन्याच्या मोहरांची थाळ भरून ओवाळून ती वाटून टाकणे, रत्नाच्या थाळी भरून त्या ओवाळून टाकूण देणे, वगैरे क्रिया राजावरील भक्तीने आनंद प्रकट करण्याकरिता केल्या जातात. राजाला त्याची अपेक्षा नसते. राजाची ओवाळणी त्याजवळ असलेले लोक घेतात. त्याप्रमाणेच भगवान अरिहंताच्या पुढे अष्टद्रव्य चढविणे आहे. पूजन करण्यायोग्य ज्या नऊ देवता आहेत त्याविषयी गोमटसारात असे लिहिले आहे.

अरहंतसिद्धसाहुतिदयं जिणधम्मवयणपडिमा हु।

जिणणिलया इदि एदे णवदेवा दिंतु मे बहिं।। १।।

अर्थ - अरिहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय, सर्व साधू, जिनधर्म, जिनवचन, जिनप्रतिमा आणि जिनमंदिर ह्या नऊ देवता आहेत त्या मझ्या रत्नत्रयाची पूर्णता करोत.

जेथे अरिहंतांचे प्रतिबिंब आहे तेथे नऊही देवता गर्भित आहेत असे जाणावे, कारण आचार्य, उपाध्याय व साधू हे तर अरहंचाच्या पूर्व अवस्था आहेत. सिध्द ही नंतरची अवस्था आहे. प्रथमत: अरिहंतपद नंतर सिध्दपद प्राप्त होते. अरहंताची वाणी ते जिनवचन( वाणीने प्रकट केलेला जो जिनधर्म( अरिहंताचे बिंब जेथे विराजमान केले आहे ते जिनालय. याप्रमाणे नवदेवतारू प भगवान् अरिहंताच्या प्रतिबिंबाचे दररोज पूजन करणे योग्य आहे. अरिहंताच्या प्रतिबिंबाची अधोलोकात भवनवासीतील चमरवैरोचनादिक इंद्र व असंख्यात भवनवासी देव, मध्यलोकी चक्रवर्ती, नारायण, बलिभद्रादिक अनेक धर्मात्मा जीव. व्यंतरलोकातील देव, ज्योतिर्लोकातील चंद्रसूर्यादि असंख्यात देव, स्वर्गलोकातूल सौधर्म-इंद्रादि असंख्यात कल्पवासी देव पूजा करतात. याप्रमाणे त्रैलोक्यातील भव्यजीवांकडून वंद्य व पूज्य अशा अरिहंताच्या तदाकार प्रतिबिंबाचे भव्यजीवांकडून सदैव पूजन केले जाते.

पाजू दोन प्रकारची आहे. एक द्रव्यपूजा, दुसरी भावपूजा त्यातून अरीहंताच्या प्रतिबिंबाला मुखाने स्तुती करीत, नमस्कार करू न, तीन प्रदक्षिणा देऊन, दोन्ही हात जोडून मस्तक नमविणे, त्यापुढे जलचंदनादि अष्टद्रव्ये चढविणे याला द्रव्यपूजा म्हणतात. अरिहंताच्या गुणांच्या चिंतनात एकाग्र होऊन इतर सर्व विकल्प सोडणे व अरिहंताच्या प्रतिबिंबाचे ध्यान धारण करणे याला भावपूजा म्हणतात. अथवा पूजेकरिता शुध्द जागी थोड्या पाण्याने स्नान करू न शुध्द वस्त्राने, विनयपूर्वक हात जोडून भक्तिसहित उज्जनल व निर्दोष जलाने प्रतिमेचा अभिषेक करणे यालाही पूजन म्हणतात. त्यावेळी मी साक्षात अरिहंताला स्पर्श करीत आहे, त्यांचा अभिषेक करीत आहे असा विचार मनात आणावा. हा शुध्द भक्तीचा महिमा आहे. शुध्द पाणी

झआरीमध्ये घेऊन भगवंताच्या प्रतिमेपुढे उभे राहून पुढील चिंतन करावे.

(( हे जन्मजरामरणाला जिंकणाऱ्या जिनेश्वरा( मी जन्म-रा-मरण-निवारणार्थ पाण्याच्या तीन धारा आपल्या चरणारविंदापुढे सोडतो( भगवन्, आपल्या चरणाला शरण येणे हेच जनमजरामरणरहित होमय्चा कारण आहे. संसारपरिभ्रमणाचा ताप नाहीसा करणाऱ्या देवा ( मी पण तोच नष्ट करण्याकरिता चंदनपूर्वक द्रव्ये आपल्या चरणारविंदापुढे चढवितो. अविनाशी पदधारक भगवंता( मी पण अक्षयपदप्राप्त्यर्थ आपल्यापुढे अक्षता क्षेपण करतो. हे कामबाणविध्वंसका ( मी तुजपुढे कामवेदना नाहीशी करण्याकरिता पुष्पराशि अर्पण करतो. क्षुधारोग नाहीसा करणाऱ्या जिनेन्द्रा ( मी तोच रोग न्ष्ट होण्याकरिता नैवेद्या अर्पण करतो. मोहान्धकार नाहीसा करणाऱ्या जिनेन्द्रा ( मी अज्ञानान्धाकार नष्ट होण्याकरिता तुजपुढे दीव समर्पण करतो. अष्टकर्मदाहक जिनेन्द्रा ( मी अष्टकर्मनाशनार्थ धूप समर्पण करतो.(( याप्रमाणे

आपल्या योग्यतेनुसार एक द्रव्याने दोन, तीन चार, पाच, सहा, सात, व आठही द्रव्यांनी पूजन करू न आपले परिणाम परमेष्ठीच्या ध्यानामध्ये लावाले.भगवंताच्या गुणांचे स्तवन करू न महान पुण्य उपार्जन करू न घ्यावे, पापाची निर्जरा करावी. जिनेश्वराची पूजा करणारे चार प्रकारचे देव कल्पवृक्षापासून उत्पन्न होणार्या गंध-पुष्प-फलादि सामग्रीने पूजन करतात. सौधर्मेन्द्रादि सम्यग्दृष्टि जीव जिनवराची भक्ती व पूजन यानेच आपला उत्तम जन्म सफल आहे असे मानतात. मनुष्यात चक्रवर्ती नारायण, बलभद्रादिक राजेन्द्र आहेत, ते मोत्याचे अक्षत, रत्नांची पुष्पे, फले, दीप व अमृतपिण्ड वगैरे पदार्थांनी जिनेन्द्राचे पूजन, स्तवन, गान, नृत्य करू न महापुण्य उपार्जन करतात. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे सर्व आपुआपले सामर्थ्य, ज्ञान, कुल, बुध्दी, संपत्ती, संगती पाहून जिनेन्द्राची पूजा करतात. तसेच देशकालाला योग्य असे अनेक स्त्री-पुरुष धनाढ्या, निर्धन, रोगी, निरोगी सर्व पूजन करतात. कित्येक गावात, शहरात, अरण्यात, खेड्यात राहात असतात. त्यातूनही कित्येक लोक अष्टद्रव्यांची निर्मल सामग्री तयार करू न भगवंताचे गुणगान करू न पुजन करतात. कोणी कोरडे गहू, जवस, हरभरे, मका, बाजरी, उडीद, मूग वगैरे धान्याच्या मुठी भरू न देवाला चढवून पूजा करतात. कोणी भाकरी चढवितात, कोणी शिरा, खिरा, भात, ताळ वगैरे अनेक प्रकारचे अन्न चढवितात, कोणी नानाविध मेवा मिठाई आणून चढवितात, कोणी मोत्याचे तंदूळ, रत्नाचे दीव, सोन्यारुप्यांनी व पंचरत्नांनी जडलेली जडावाची फुले व फले वगैरे चढवून पूजा करतात, कोणी दूध दहू, तूप चढवितात, कोणी घेवर, लाडू, वेढे, बरफी, पुड्या, पूवा वगैरे पक्वान्न चढवितात, कित्येक नुसती वंदनाच करतात, कित्येक स्तवन, गान, नृत्य, वादित्रांनी भडन करतात, कित्येक अस्पृश्य-शूद्र मंदिराबाहेरू नच शिखरावरील जिनबिंबाला नमस्कार करतात. त्याप्रमाणे देशकला पाहून जिनेश्वराची आराधना करावी. याप्रमाणे वीतरागप्रभूंचे स्तवनपूजन करू न आपापल्या परिणामाप्रमाणे सर्वांनी उत्तम मध्यम, जघन्य पुण्य उपार्जन करावे.

जैनधर्म जाति किंवा कुलावर अवलंबून नाही. धनसंपत्तीच्या आधीन नाही. बाह्य क्रियेवर अवलंबून नाही. हा फक्त ज्याच्या त्याच्या परिणामाच्या विशुध्दतेवर अवलंबून आहे. कोणी मोठा अभिमानी, श्रीमान पुरष असला व त्याने आपली कीर्ती व्हावी म्हणून मोत्यांच्या अक्षता, रत्नांचे दिवे, सुवर्णाची पुष्पे वगैरेनी पूजन केले व अनेक प्रकारच्या गानवादित्र-भजनपूजनांनी मोठी प्रभावना करू न देखविली तरी अल्पपुण्य संपादन करणारा होईल. कदाचित अल्पपुण्यबंध देखील न होता उलट कर्मबंध देखील होईल. कारण बंध कषायाच्या आधीन आहे. कोणी आपल्या भाविवषुध्दीने प्रेमळ भक्तिमान बनून एखादे फळ वा पान वा अन्नाचा कण अर्पण करील व मनोभावा-पासून निर्मल स्तवन करील त्याला महान् पुण्याचा बंध होईल व तो अनेक जन्मात

संचय केलेल्या पापाचा नाश करील. द्रव्याने पुण्य विकत मिळत न ाही. ज्यांनी इच्छा नाहीशी केली, कषाय मंद व ख्याती, लाभ, पूजा वगैरे कशाचीच पर्वा न करात केवळ परमेष्टीवरील गुणावर प्रीती केली, त्यांनाच जिनपूजनाचे विशेष फल प्राप्त झाले आहे व होईल.

जिनपूजन सचित्त व अचित द्रव्यांनी करावे असे परमागमात सांगितले आहे. ज्यांना सचित्ताच्या दोषापासूंन भीती वाटते ते मोठ्या प्रयत्नाने प्रासुक जनल, चंदन, अक्षात व अक्षुतांलाच चंदन कुंकुम लावून, सुगंधित करून, त्यावर पुष्पांचा संकल्प करून पूजा करतात. तसेच शास्त्रात वर्णिलेली सोन्याची, रुप्याची, जडावाची फुले व लवंगा तयार करवून त्यांनी पूजन करतात व प्रासुक अशा, ज्यात फार आरंभ करावा लागला नसेल अशा काही थोड्याशा नैवेद्याने पूजन करतात. शक्य असेल ते लोक रत्नाचे दिवे अथवा सोन्यारूप्याच्या पुष्पांनी पूजन करतात. अथवा सचित्त कण द्रव्याला केशराचा रंग देऊन त्याला दिव्याचा संकल्प करून त्याने पूजन करातात. याप्रमाणे ते अचित्त द्रव्यांनी पूजन करतात. जे सचित्त द्रव्यांनी भगवंताची पूजा करतात, चंदन, अगरबत्ती, धूप वगैरे चढवितात, बदाम, जायफळ वगैरे शुध्द फले घेऊन पूजा करतात ते जल, गंध अक्षतादि उत्तम व निर्मल पदार्थ घेऊन तसेच चमेली, चंपकमल, सोनचाफा वगैरे सचित्त पुष्पे घेऊन पूजन करतात. तुपाचा दीप, कर्पूराची आरती, सचित्त फले आंबा, केळे, डाळिंब वगैरेनी पूजितात, अग्नीवर धूप दहन करता. हे दोन्ही मार्ग शास्त्रप्रणीत व सनातन आहेत व आपल्या परिणामावर अवलंबून असणाऱ्या पुण्यबंधनाला कारण आहेत.

पुष्पासारखा वनस्पतीत विकलत्रय जीवांची उत्पत्ती विशेषत: अधिक होते. पुष्पामध्ये द्वेंद्रिय, त्रिंद्रिय, चतुरिंद्रिय व पंचेंद्रिय त्रस जीव प्रत्यक्ष आपण पाहतो. फुलांना जर एखाद्या पात्रात घेऊनढ टकले तर हजारो जीव त्यातून बाहेर पडून उडताना आपल्या दृष्टीस पडतात. फुलात त्रस जीव फार असतात. याशिवाय बागनिगोदजीव अनंत असतात. चैत्रमासी व पावसाळय्ात तर त्रसजीवांची उत्पत्ती फारच होते. अशी स्थिती पुष्पांची आहे. याविषयी ज्ञानवान पुरुषांनी विचार करून धर्मबुध्दी मनात जागृत ठेवून सर्व क्रिया यत्नाचारपर्वूक केल्या पाहिजेत. कोणतीही क्रिया करताना जीवाची विराधना न होण्याची खबरदारी घेतली पाहिजे. या दृष्टीने पाहता फुले धूत असता असंख्य त्रसजीवांची हिंसा होते. यात हिंसा अधिक घडून पूजन करण्यात होणारी परिणामाची विशुध्दता तोकडी पडते. म्हणून पक्षपात न ठेवता जिनप्ररूपित अहिंसाधर्माला अनुसरून जितकी कार्ये करता येतील तितकी सर्व मोठ्या सावधानतेने जीवविराधना टाळून करावी.

कलिकालात भगवंतानी वर्णिलेल्या नयविभागाला कोणी जाण नाहीत, शास्त्रात सांगितलेल्या वियांचा न्यायदृष्टीने विचारही करीत नाहीत आपल्याच कल्पनेने एखादा पक्ष ग्रहण

करू न त्यामार्गाने यथेच्छ प्रवर्तन करण्याची प्रवृत्ती विशेषत: दिसून येते. कित्येक पक्षपाती लोक भाद्रबद-मासी दिवसा पूजा न करता ती रात्री करतात. दिवे लावून नैवेद्य चढवितात, फुलांच्या राशीच्या राशी देवापुढे वाहतात. त्यात लाखो माशां, डांस मत्छर वगैरे जीव उत्पन्न होतात व ते दिव्यावर पडून मरण पावतात. दिव्याच्या निमित्ताने रात्री असंख्यातजीव, डास, लाल, पिवळ्या रंगाची पाखरे, अनेक त्रस जीव, लहान लहान शरीर धारण करणारे जीव पूजन सामग्रीच्या ताटात येऊन पडून मरण पावतात. ते आपल्या तोंडात, नाकात, कानात पण जातात. आपण त्यांना निवारीत असता ते आपल्या अंगावरू न उडून जाता नाहीत. इतकी घडणारी हिंसा प्रत्यक्षा पाहाता असूनही काही लोक आपला पक्षा न सोडता हटकून रात्रीच पूजन करतात. रात्रौ सर्व प्रकारचे आरंभ सोडून यत्नाचारपूर्वक रहावे अशी शास्त्राची आज्ञा आहे. धर्माचे स्वरू प बाह्यत: जीवदया वन अंतरंगात रागद्वेषमोहाचा विजय असे आहे. जिथे जीव-हिंसा घडेल तिथे धर्म नाही व जेथे अभिमानाला वश होऊन एक पक्षा ग्रहण करू न त्येच समर्थन करण्यात ज्यांना हिंसेची भीती वाटत नाही त्यांना धर्मवान् कसे म्हणता येईल( कित्येक एकांती लोक मंडल मांडून ते आठआठ, दहा-दहा दिवस ठेवतात. त्या सामग्रीत प्रत्यक्षा आळ्या, किडे उत्पन्न होतात. फले वगैरे चढिवलेली असतात ती नासून जातात. वैवेद्य चढविलेला असतो. त्याच्या वासाने किड्या मुंग्यांचे प्रवाह चालू होतात व ते प्रभावना पाहण्याकरता जी माणसे येतात त्यांच्या पायाखाली चिरडून मरू न जातात. हे प्रत्येक्षा पाहून देखील आपल्या पक्षाचा अभिमान त्यांना सोडवत नाही. त्यांना रात्रभर पूजेची सामग्री ठेवणे याला हिंसेचे पातक घडते.

अनेक पुरुणामध्ये व श्रावकाचारामध्ये अरिहंचात्या प्रतिमेचे अष्ट-द्रव्यांनी पूजन करावे म्हणून उपदेश आहे व कोठे कोठे अरिहंतप्रतिबिंबाचे स्तवन व कोठे अभिषेक करावा असे वर्म आहे. पण साक्षात् प्रतिबिंब पुढे असताना पुन: स्थापना करण्याची आवश्यकता नाही. सांप्रत प्रतिमा साक्षात् पुढे विराजमान असतानाही स्थापना करणए अवश्य आहे असे म्हणतात. जयपूर शहरी संवत् १८५० साली आपल्या कल्पनेने कोणी या स्थापनेची प्रव-त्ती चालू केली आहे. त्यात अरिहंत, सिध्द, आचार्य, उपाध्याय, साधु, जिनवाणी, दशलक्षाश्रणिक धर्म, षोडशकारण, रत्नत्रय अशी नऊ प्रकारची स्थापना करावी असे त्यांचे म्हणणे आहे व ज्यांना सप्तव्यसन, अभक्षय वगैरेंचा त्याग असेल त्यांनी स्थापना करू न पूजन करावे. व ज्याना त्याग नसेल त्ांनी स्थापना करू न नये, फक्त पूजन करावे. स्थापनायुक्त पूजन ज्याला अन्याय, अभक्षय व स्प्तव्यसनाचा त्याग आहे त्यांनीच करावयाला पाहिजे. स्त्रियांनी रंगविलेले व स्त्र नेसून स्थापना न करात पूजन करावे असे त्यांचे म्हणणे आहे. असे म्हणणारे जे असतील ते साक्षात असलेले जिनबिंब मानत नसावेत्से वाटते. इतरांनी स्थापनेशिवाय पूजन करावे. तदाकार तांदळाच्या स्थापनेचाच

विनय करावा. प्रतिबिंबाचा विनय करण्याचे मुख्य कर्तव्य उरले नाही. प्रतिमेचे पूजन, वंदन, स्तवन वाटले त्याने करावे पण पिवळ्या तांदळामध्ये स्थापना करणे हा उत्तम पक्ष व तो अभक्ष्यादि पापरहित असेल त्यालाच योग्य. याप्रमाणे पिवळ्या अक्षतेमध्ये स्थापना करणे हा मुख्य विनय व प्रतिमेचे पूजन वगैरे गौण असे त्यांचे मत दिसते. याशिवाय ज्या तीर्थकरांची जी प्रतिमा असेल त्यापुढे त्याचीच पूजा व स्तुती केली पाहिजे. दुसऱ्या तीर्थकराची करता उपयोगी नाही, जर ककरावयाची असेल तर त्याची तांदळामध्ये दुसरी स्थापना करून केली पाहिजे.

याबाबतीत त्यांना असे विचारावयाचेकी, श्रीसमंमतभद्रस्वार्मींनी शिवकोटी राजाच्या समक्ष स्वयंभूस्थोत्र रचून स्तवल केले व चंद्रप्रभ प्रभूची प्रतिमा प्रगट झाली. मग चंद्रप्रभ चंद्रप्रभू इतर सोळा तीर्थकरांचे स्तवन कसे केले( जर एका प्रतिमेपुढे त्याचेच स्तवन करणे योग्य असेत तर स्वयंभूस्तोत्र म्हणणेच योग्य नव्हते. श्रीआदितीर्थकराच्या प्रतिमेशिवया इतरापुढे भक्तामर-स्त्रोतही म्हणता येणार नाही. श्रीपार्श्वनाथ तीर्थकराच्या प्रतिमेशिवाय कल्याणमंदिर स्तोत्रही म्हणू नये. पंचपरमेष्ठीची प्रतिमा अस्लयाशिवाय व स्थापनेशिवाय पंचनमस्कार मंत्र तरी कां म्हणआवा( कायोत्सर्ग साप्य, पंचपरमेष्टींची नांवे व सामायिक वगैरे काही एक करता कामा नये. तसेच परदेशी अनोळखी मंदिरात प्रथमत: कोणी मूर्ती आहे समजल्याशिवाय एकदम जाऊन स्तु करणे वगैरे क्रिया असंभवी होतील. रात्री एखादी प्रतिमा लहान असल्याने त्यावरील चिन्ह लवकर न समजल्याने स्तुती करता येणार नाही. अथवा एका मंदिरात अनेक प्रतिमा असतील त्यातून ज्याचे प्रतिमेचे स्तवन करावयाचे असेल त्यापुढे हात जोडून स्तुती म्हणणे प्राप्त होईल. दुसऱ्या प्रतिमेकडे दृष्टी जाता उपयोगी नाही असे ठरेल. दुसरे, एका मंदिरात अनेक प्रतिमा असताना एकाच प्रितमेचे नामोच्चारण करून स्तुती करणे म्हणजे इतर प्रतिमांचा निराधर केल्यासारखे होणार नाही काय( मग भक्ती कोठे राहिली( यावर पुष्कळ प्रतिमा असल्यास चोवीसही प्रतिमांचे नामोच्चारण करून स्तुती करावी असे म्हटले जाईल. तर त्याठिकाणी जर वीस किंवा बावीसच मूर्ती असतील तर प्रथमत: त्या प्रतिमांची सर्व चिन्हे पाहून निश्चय करावा लागेल व जितक्या प्रतिमा कमी असतील तेवढ्यांची नांवे कमी करून बाकीच्या प्रतिमांची स्तुती करावी लागेल. याचप्रमाणे जेथे प्रतिमा लहान असतील अथवा अंधारामुळे स्पष्ट दिसन नसतील तेथे इतरांना विचारून स्तुतिपाठ म्हणावयास लागावा लागणनार( ाप्रमए एकान्तिक कल्पना करण्यात अनेक दोष उत्पन्न होतात.

स्थापनेचे पक्षपाती स्थापनेशिवाय जर प्रतिमेचे पूजन करणार नाहीत तर स्तवन-मदन करण्याची योग्यताच प्रतिमेत नाही असे ठरले. जर पिवळ्या तांदळाच्या अतदाकार स्थापनेलाच पूज्य मानले तर धातुपाषाणाची तदाकार प्रतिमा स्थापन करणअयाचेतरी काय प्रयोजन(

अकृत्रिम चौत्यालयामध्ये जिनप्रतिबिं अनादिकालापासून स्थापित आहे. त्यातदेखील पूज्यपणा राहिला नाही. यावर स्थापना पक्षवाले म्हणतात की एका प्रतिमेपुढे एकचेच पूजन करावे. एका प्रतिमेपुढे जर इतरतेवीस तीर्थकारंचे पूजन करावयाचे असल्यास तपीततंदुलींनी स्थापन आकरून केले पाहिजे. याप्रणाणे केल्याने तेवीस प्रतिमांचा संकल्प पीत अक्षतेत झाला जयमाला,स्तवन, पूजन करातंना पूजकाने आपली दृष्टी त्या स्थापीत पीततंतुलाच्या स्थापनेकडे ठेवावी. एक प्रतिमेमध्ये चौवीस प्रतिमांचा संकल्प अयोग्य आहे. म्हणून तेवीस प्रतिमांच्या एवजी तेवीस पुष्पांची स्थापना करावी. पण स्थापनेशिवाय पूजन कराता येत नसेल. तर घरी, वनात, अन्यदेशात अरिहंताचे स्तवन वा वंदन केस करावयाचे( याप्रमआणे प्रतिपादन करणाऱ्यांना शास्त्रज्ञान नाही्से म्हणावे लागते, कारण चोवीस तीर्थकरांचे पूजन करा म्हणावयाचे व शेवठी शांती करण्यासाठी फक्त सोळाव्या तीर्थकाराचे स्तवन केले म्हणजे पुरे असे म्हणावयाचे या म्हणण्यात काही अर्थ आहे काय(

वर जे एकांतिक स्थापनावाद्यांचे म्हणणे वर्णिले आहे ते अवास्तव आहे. एकाच तीर्थकराला निरुक्तीच्या व्दारे चौवीस नांवे देता देतात. अथवा एका हजार आठ नावांनी सौधर्मेंद्रने तीर्थकराचे स्तवन केले आहे. एका तीर्थकारेच अनंत गुण व त्या त्या गुणाप्रमाणे अनंत नावे एका तीर्थकराला देता येतात. ही चोवीस नांवे व अशी अनंतानंत नावे अनंतकालात अनंत तीर्थकराला दिली गेली आहेत. तसेच त्यांच्या माता-पित्यांची नांवे, शरीराची अवगाहना व वर्ण वगैरे पण अनंत आहेत. म्हणून एका तीर्थकराच्या ठायी एकाचा व चौवीसाचा ही संकल्प केला तरी तो संभवतो. याकालात इतर धर्मी लोकांनीही आपआपल्या समजुतीप्रमाणे वेगवेगळया तऱ्हेने पूजनाचे प्रकार कल्पिले आहेत. म्हणूनव या कालाला अनुसरून आपल्याच आचार्यांनी तदाकार स्थापनेची मुख्यता वर्णिली आहे. जर आज अतदाकार स्थापनेला मुख्यता दिली गेली तरी वाटेल त्या जीवांमध्ये अथवा इतरधर्मानुयायांच्या प्रतिमेमध्ये धेखील स्थापनेचा संकल्प होऊ लागेल. यामुळे सन्मार्ग भ्रष्ट होईल. इंद्र भगवंताला जन्माभिषेक करून मेरू पर्वतावरून येऊन येतो त्यावेळी ध्वजेवर जे चिन्ह स्थापन केलेले असते तेच प्रतिमेच्या खालील आसनावर नामनिर्णयादि व्यवहाराकरिता घालावे लागते. वस्तुत: अरिहन्त परमात्मा स्वरूपाच्या दृष्टीने एकरूप आहे व नामादिकांच्या दृष्टीने अनेकरूप आहबेत. सत्यार्थ ज्ञानसा्भावन, रत्नक्षात्रयास्वरुप व वीतरागभाव याही करून पंचपरमेष्टीरूप प्रथिमा एकच आहेत, म्हणून परमागमाच्या आज्ञाविरुध्द विनाकारण विकल्प योजून शंका उत्पन्न करणे योग्य नव्हे, भगवंताची अथवा जिनसूत्राची जी आज्ञा असेल ती प्रमाण मानली पाहिजे.

व्यवहारात पूजा पाच प्रकारांनी केली जो. आव्हान, स्थापन सन्निधीकरण, पूजन व विसर्जन यात परिणामशुध्दीला पुष्टी यावी म्हणून प्रथमत: आव्हान करण्यात पुष्पाची वृष्टी करवाी. प्रतिमा काही पुष्नपांना जाईीत नाही. आव्हानाचा संकल्प करू न पुष्पांजली क्षेपण करपणअयाची एक रूढ ी आहे. पूजेच्या प्रारंभी स्थापनचा पाठ असल्यास स्थापना करू न घ्याव, नसल्यास तेच पूजन करावे. आपण अनेकांती आहोत. आपणाला सर्वथा एकाच पक्षाचा हट्टा नसावा. भगवान् परमात्मा सिध्द लोकात विराजमान आहेत तेथून चलायमान होत नाहीत, पण तदाकार बिंबाशी एकाग्रगता (ध्यान) होण्याकरिता साक्षात् अरिहहंत, सिध्द, आचार्य उपाध्याय व साधूच्या स्वरू पाच प्रतिमेमध्ये निश्चय करू न प्रतिबिंबाचे ध्यान, पूजन व स्तवन करावे लागेत.

कित्येकांचे म्हणणे आहे की भगवंताचे प्रतिबिंब समक्ष असल्यावाचून सभेतील इतर लोकांपुढे भगवंताच्या गुणांची स्तोत्रे म्हणू नये हे म्हणणे अयोग्य आहे. भगवंताचे ध्यान, स्तवन वगैरे परमेष्ठील अंतरंगात नजरेसमोर आणून करावे लागते पण जे भजन पूजन करम्याचा निषेध करीत असतील त्यांना पंचनमस्काराचा जप, स्तुती, सामायिक, वंदना वगैरे प्रतिमा असल्याशिवाय करता येणार नाहीत, तसेच शास्त्र वाचण्याच्या पूर्वी नमस्काराचे श्लोक देखील म्हणता येणार नाहीत, म्हणून मिथ्या शंका करणाऱ्या लोकांच्या सागण्यावरू न ध्यान, स्तवन, पूजन वगैरे क्रिया करण्यापासून कदापि पराङ्मुख होऊ नये.

आता प्रकरणानुसार अकृत्रिम चैत्यालयाचे स्वरू न थोड्या यात श्रीत्रिलोकसार गँथाच्या अनुरोधाने सांगितले असता वावगे होणार नाही. अघोलोकात सात कोटी बहात्तर लक्ष (७,७२००००) भवनवासी देवांचे घरे आहेत. त्यातून कित्येक घरे असंख्यात योजन विस्ताराची आहेत. कित्येक संख्यात योजन विस्ताराची आहेत. त्या त्या एकेका घरात असंख्यात भवनवासी देवाकडून वंदनीय असे एकेक जिमंदिर आहे. याप्रमणे ७,७२०००० जिमंदिरे आहेत. मध्येलोकात पंचमेरू चवर ८० जिमंदिरे, गजदंतावर २०, कुलाचलावर ३०, विजयार्ध्द पर्वतावर १७०, देवकुरू उत्तर कुरुमध्ये १०, वक्षारगिरीवर ८०, मानुषोत्तर पर्वतावर ४, इष्वाकार पर्वतावर ४, कुंडलगिरीवर ४, रुचिकगिरीवर ४, नंदीश्वर द्पीात ५२ याप्रमाणे मध्य लोकात ४५८ मंदिरे आहेत. ऊर्ध्वलोकी, स्वर्गात आणि अहमिंद्रलोकात चौर्यांशी लाख सत्याण्णव हजार तेवीस (८४९७०२३) मंदिरे आहेत. व्ंतर देवांची व ज्योतिर्लोकाची असंख्यात जिनमंदिरे आहेत. याप्रमाणे ज्यांची संख्या येते अशी आठ कोटी छप्पन लोख सत्याण्णव हाजर चारशे एक्या याएंशी ८५६९७४८१ आहेत.

जिनालयाचे उत्कृष्ट, मध्यम व जघन्य असे तीन भेद आहेत. यातून उत्कृष्ट जिनालयाची लांबी १०० योजने व रुंदी पन्नास योजने व उंची पचाहत्तर योजनांची आहे. मध्ये जिनमंदिर पन्नास योजने लांब पंचवीस योजने रुंद व साडेसदत्तीस योजने उंच अशी आहेत. जधन्य पंचवीस योजने लांब, साडेबारा योजने रुंद व पावणे एकोणीस योजने उंच अशी आहेत. सर्वांचा पाया जमिनीत अर्धा योजन खोल आहे. या जिनमंदिरांना तीन तीन व्दारे आहेत. सन्मुख द्वाराचे प्रमाण-उत्कृष्ट मंदिराच्या व्दाराची उंची सोळा योजने व रुंदी आठ योजने आहे. मध्यम मंदिराच्या लहान द्वाराची उंची चार योजने व रुंदी दोन योजने व जघन्य मंदिराच्या लहान द्वाराची उंची दोन योजने व रुंदी एक योजन आहे. भद्रशालवन, नंदनवन, नंदीश्वर द्वीप आणि स्वर्गातील विमाने यात उत्कृष्ट प्रमाणाची जिनालये आहेत, सौमनसवन रुचकरपर्वत, कुंडलगिरी, वक्षावरगिरी, इष्वाकार मनोषोत्तर आण कुलाचल पर्वत यावर मध्य्म प्रमाणाची जिनमंदिरे आहेत. पांडुक वनातील जिनालये जघन्य प्रमाणाची ाहे.त. विजयार्ध्दपर्वत व जंबूशाल्मलिवृक्ष यावरील जिनमंदिराची लांबी एक कोस व बाकीची जी भवनवासीच्या घरातील व व्यंतरजोतिषलोकातील असंख्यात जिनालये आहेत त्यांची लोंबी रुंदी जिनांनी जशी पाहिली आहे तशी आहे.

जिनमंदिराचा बाह्य परिसर सात गाथेत वर्णिला आहे तो असा-सर्व जिनमंदिरांच्या चोहोंबाजूला चार व्दारांनी युक्त असे र्तनमयी तीन कोट आहेत. जरवाज्यातून जाण्याच्या ज्या लहान लहान वाटा आहेत त्याठिकाणी एकेक मानस्तंभ व नऊ नऊ स्तूप आहेत. तीन कोटाच्या अंतरामधअये पहिल्या दुसऱ्या कोटाच्या अंतरात वन आहे. दुसऱ्या व तिसऱ्या कोटाच्या अंतरात ध्वजा आहेत. तिसरा कोट व चैत्यालय मधील अंतराय चैत्यभूमी आहे. तेथील चैत्यालयात एकशे गर्भगृहे आहेत. मध्यभागी रत्नजडित खांबांनी युक्त सुवर्णाचा दोन योजन रुंद, आठ योजन लांब व चार योजन उंच अशा देवच्छंद म्हणजे मंडप आहे. त्याला गुमज असून छत आहे. त्यात एकशे आठ प्रतिमा आहेत. त्या प्रतिमांना वेगवेगळे सिंहासन, छत्र, चामर, प्रातिहार्य वगैरे आहेत. प्रतिमेच्या मस्तकावर काळेभोर केश आहेत. ते खरोखरी रत्नाचे काशाकार परिणमन आहे. तोंडामध्ये दादात्चया आकाराचे हिरे बसविवलेले आहेत. पोवळ्याप्रमाणे तांबडे लाल ओठ आहेत. नवीन कोवळ्या लाल पानासारखे शोभायमान हातापाचे तळवेआहेत. श्रीराजवार्तिक ग्रंथात प्रतिमेचे वर्णन करताना-लोहिताक्ष मण्यांनी पव्याप्त आहेत मांड्या जांयच्या, स्फटिक मणण्यांचे आहेत नेत्र ज्यांचे, अरिष्ट णण्यासारखी नेत्राची तारका आहे ज्यांची, अंजनमूल मण्यासारखी फणी व भिवया ज्यांच्या आहेत. नीलमण्यासारखे ज्यांचे केश आहेत असे म्हटले आहेत. दहा ताल (एक ताल बारा अंगुलाचा असतो) प्रमाणे उंच व १००८ लक्षणांनी युक्त त्या प्रतिमा आहेत. ती जिनमूर्ती पाहताक्षणीच असे वाटते की ह्या प्रतिमा साक्षात् बोलतातच की

काय ( एकेका गर्भगृहामध्ये बरोबर ओळीने उभे राहिलेले नागकुमार अथवा यक्षांचे बत्तीस युगल हातात चामर घेऊन उभे आहेत. प्रतिमेच्या दोन्ही बाजूला सर्व वस्त्राभरण अलंकारांनी सुशोभित होऊन पांढऱ्या रत्नमयी चवऱ्या हातात घेऊन नागकुमार किंवा यक्ष चौसष्ट चामर प्रभूवर ढाळीत असतात. याप्रमाणे एकशे आठ प्रतिमांची वेगवेगळी प्रातिहार्ये एकेका मंदिरात आहेत. जिप्रतिमेच्या मागच्या बाजूस श्रीदेवी व सरस्वतीदेवी, सर्वाण्ह यक्ष व सनत्कुमार यक्ष यांच्या आकाराच्या प्रतिमा काढलेल्या आहेत. झारी, कलश, दर्पण, पंखा, ध्वजा, चामर, छत्र, ठोना ही आठ मंगल द्रव्ये प्रभू पुढे ठेवलेली असतात. याप्रमाणे आठ प्रतिमापाशी अशी मंगलद्रव्ये ठेवलेली आहेत.

गर्भगृहाची बाह्य रचना या प्रकारची असते. रत्नानी जडलेल्या सुवर्णमय पुष्पांनी शोभणार्या मंडपाच्या मध्यभागी रुप्याचे व सोन्याचे बत्तीस हजार कलश आहेत. महाद्वाराच्या दोन्ही बाजूना चौवीस हजार धूपाच्या धागरी ठेवलेल्या आहेत. महाद्वाराच्या बाहेरच्या बाजूला दोन्ही अंगास आठ हजार रत्नांच्य माला लटकविलेल्या आहेत. त्या रत्निमालांच्या मध्येभागी चौवीस हजार सुवर्णमाला आहेत. महाद्वाराच्या पुढच्या मुखमंडपात सोळा कलश असून तितक्याच सुवर्णमाला आहेत. मुखमंडपात सोळा हजार धूपघट आहेत. मध्यभागी महान शब्द करणाऱ्या मोत्यांनी वेष्टित रत्नांच्या लहान घंट्यानी युक्त अशा अनेक प्रकारच्या मोठ्या घंटा आहेत.

जिनमंदिराच्या लहान व्दाराचे स्वरूप-दक्षिण उत्तरेच्या मागच्या लहान द्वाराची वर वर्णिलेल्या वर्णनाहून सर्व तऱ्हेची अर्धी रचना आहे. रत्नमाला चार हजार, धूपघट बारा हजार, सुवर्णमाला बारा हजार आहेत व दारासमोरील मुखमंडपात सुवर्ण घट आठ हजार, सुवर्णमाला आठ हजार, धूपघट आठ हजार व अनेक प्रकारच्या लहान लहान गंट्या आहेत मंदिराच्या पृष्ठभागी रत्नमाला आठ हजार व सुवर्णमाला चोवीस हजार आहेत. या माला चार ही बाजूंना भिंतीवर लोंबत्या सोडलेल्या आहेत.

मुखमंडपात विस्तार वगैरे त्रिलोकसार ग्रंथात पंधरा गाथांनी वर्णिला आहेत. त्याचा सारांश:-

मंदिरापुढे मुखमंडप आहे. तो जिनमंदिरासमान शंभर योजन लांब, पन्नास योनज रुंद व सोळा योजन उंच असा आहे. त्या मुखमंडपापुढे चौकानी प्रेक्षणमंडप आहे. तो शंभर योजन लांब रुंद आहे. सोळा योजनाहून काही अधिक उंच आहे. या प्रेक्षणमंडपापुढे ऐंशी योजन लांबरुंद व दोन योजन उंच असे सुवर्णमय पीठ आहेत. पीठ म्हणजे चबुतरा. त्या चबुतऱ्यावर मध्यभागी चौसठ योजन लांब रुंद व सोळा योजन उंच आस्थानमंडप आहे. आस्थान-मंडप म्हणजे सभामंडप

जाणावा. या सभामंडपापुढे चाळीस योजन उंच स्तुपांचे रत्नजडित पीठ आहे. त्यापीठाला चार दारे व बारा अंबुजवेदी (कमलाकर कट्टे) आहेत, त्या पीठाच्या मध्येभागी तीन कटनीयुक्त कट्टे चौसष्ठ योजने लांब, रुंद व उंच असून त्यावर पुष्कळ जिनप्रतिमा आहेत.

स्तूप म्हणजे तीन कटनींनी युक्त अशा रत्नराशीचा चबुतरा, त्यावर जिनप्रतिमा विराजमान आहेत. याप्रमाणे नऊ स्तूप आहेत. त्यांचा क्रम व स्वरूप असे आहे. या स्तूपाच्या पुढे एकहजार योजने लांब रुंद (गिरद) बारा वेदींनी संकुय्क असे सुवर्णपीठ आहे. त्यावर चार योजने लांब व एक योजन जाड, चार महाशाखा व लहान अनेक शाखा असलेले, ज्या वरचा भाग बारा योजन विस्ताराचा असून, अनेक प्रकारच्या फलपुष्पांनी व एक लाख एकशे चौवीस परिवार वृक्षांनी युक्त असे सिधअदार्थ व चैत्य या नांवाचे दोन वृक्ष आहेत.

त्या वृक्षाच्या बुडख्याशी जे पीठ आहे त्यावर चार दिशांकडे चार सिध्दांच्या प्रतिमा सिध्दार्थ वृक्षाच्या मुळाशी आहेत. चैत्यवृक्षाच्या मुळाशी चार पीठ आहेत. त्यावर चार अरिहंताच्या प्रतिमा विराजमान आहेत. या वृक्षांच्या पीठांच्यापुढे दुसरी पीठे आहेत. त्यावर नानाप्रकारच्या ध्वजा वावेल्या आहेत. त्या ध्वाजांचे सुवर्णमयी खांब सोळा योजने उंच व एक कोस रुंदीचे आहेत. त्या ध्वजेच्या अग्रभागी मनुष्यांच्या नेत्रांना व मनाला रमिवणारी अशी वस्त्रे व रत्नांनी मढिवलेली तीन छत्रे आहेत. ध्वजेवरील वस्त्रे खरी वस्त्रे नसून वस्त्राच्या आकाराचे अनेक रंगाचे रत्नमयी पुद्‌गल पुरमाणु आहे. म्हणून वस्त्रे रत्नमयी आहेत असे म्हटले आहे. त्या ध्वजापीठाच्या पुढे जिनमंदिरे आहेत त्यांच्या चोहोंबाजूला अनेक प्रकार्चा पुष्पांनी युक्त शंभर योजने लांब, पन्नास योजने रुंद, दहा योजने खोल रत्नजिडत वेदींनी युक्त असे चार ऱ्हद (सरोवरे) आहेत. त्यापुणे रस्ता आहे. त्याच्या दोन्ही बाजूंना पन्नास योजने उंच, पन्नास योजने रुंद असे देवांचे क्रीडा करण्याचे दोन महाल आहेत. त्याला तोरणे लावलेली आहेत. ती रत्नमयी असून खांबाच्या अग्रभागी आहेत त्या तोरणांनी अनेक मोती व लाहन घंटा बांधलेल्या आहेत. ती पन्नास योजने उंच व पंचवीस योजने रुंद असून अनेक जिनिबंबसमूहावर फारच शोभून दिसतात. जिनिबंबाचा आकार तोरणात दाखिवलेला आहे, या तोरणापुढे स्पटिकाचा पहिला कोट असून त्याच्या आतील कोटाच्या व्दाराच्या दोन्ही बाजूंना शंभर योजने उंच व पन्नास योजने रुंद रत्नमयी दोन मंदिरे आहेत.

याप्रमाणे कोटापर्यंत वर्णन केलेल्या पूर्वद्वाराचे जे प्रमाण सांगितले त्याहून उत्तर दाराचे अर्धे प्रमाण जाणावे, बाकी च्या तीन बाजूंचे सारखे प्रमाणए आहे. त्या चैत्यालयात सामायिकादि क्रिया करण्याचे मंडप, वंदन करमअयाचे मंडप, स्नान करणअयाची जागा, अभिषेक करमअयाचा

मंडप, नृत्य करण्याचे स्थान, गायन व भजन करणअयाची जागा, प्रेक्षक-समूहांना बसण्याकरिता अवलोकन-मंडप वगैरे वेगवेगळे मंडप आहेत. तसेच क्रीडा करण्याची स्थाने, क्रीडागृह, शास्त्रस्वाध्याय करण्याची जागा, गुणनगृह (स्वाध्यायशाला), मोठमोठे नकाशे टांगून ठेवण्याची जागा (पट्टशाला) वगैरे अनेक वेगवेगळ्या जागा आहेत.

दुसरा कोट आणि बाह्य कोट यामध्ये सिंह, हज, वृषभ, गरूड, मयूर, चंद्रमा, सूर्य, हंस, कमल आणि चक्र या दहांचे आकर ज्यावर काढलेले आहेत अशा ध्वजा आहेत. त्या वेगवेगळ्या एकशे आठ आहेत. याप्रमाणे एका दिशेला एक हजार ऐंशी आहेत व चार दिशांनी मिळून चारहजार तीनशे वीस (४३२०) मुख्य ध्वजा आहेत. एकेका मुख्य ध्वजेमध्ये एकशे आठ (१०८) लहान ध्वजा आहेत. पुढे दुसर्या व तिसऱ्या कोटाच्या अंतरामध्ये अशोक सप्तच्छद, चंपक व आम्र अशी चार वने आहेत. त्याठिकमाणी सुवर्णाची पुळे असून पांचूच्या रत्नाच्या पानांचे कल्पवृक्ष आहेत व त्याला वैडूर्यरत्नाची फले आहेत. त्याच्या डहाळ्या पोवळ्याच्या आहेत. ते तीन पीठावर असून तीन कोटांनी युक्त आहेत, त्या वृक्षांना रत्नमयी शाखा, पत्र, पुष्प, फले असून ते चार वनांच्या मध्यभागी आहेत. चार चैत्यवृक्षांच्या मुळाशी (पूर्वादिक दिशात) पल्यंकासन असलेल्या सिंहासन छत्रप्रातिहार्यादिकांनी युक्त अशा चारजिनेंद्राच्या प्रितमा आहेत. नंदा वगैरे सोळा विहिरी तीन कटनीनी शोभायमान आहेत. वनभूमीमध्ये येण्याच्या दरवाज्याच्या मार्गामध्ये तीन कोट व तीन पीठावर धर्मवैभवाने शोभणारे व अग्रभागी चारी दिशांना जिनप्रतिमा असलेले मानस्तंभ आहेत. श्रीराजवार्तिकात म्हटले आहे - या जिनालयाचा महिमा वर्णन करण्यास हजार जिव्हा असणाराही समर्थ होणार नाही व एक हजार नेत्र धार करणारा इन्द्र देखील या जिनालयाला पाहात असून तृप्त झाला नाही. याप्रमाणे अप्रमाण माहत्म्य धारण करणाऱ्या अकृत्रिम जिनालयाचे वर्णन त्रिलोकसर ग्रंथातून आपल्या शुभध्यान सिध्दयर्थ सांगितले आहे, याचे चिंतन करावे.

जिनपूजन करून अनेकांना सुखप्राप्ती झाली त्यांची काही उदाहरणे -

अर्हच्चरणसपर्यामहानुभाव महात्मनामवदत् ।

भेक: प्रमोदमत्त: कुसुमेनैकेन राजगृहे ।। १२० ।।

अन्वयार्थ - (राजगृहे) राजगृहे शहरात (प्रमोदमत्त:) आनंदातिशयाने फुगलेला असा (भेक:) एक भेडूक, (एकेन कुसुमेन) एका पुष्पाने (अर्हत्चरणसपर्यामहानुभावं) श्री अरहंत

परमेष्ठीच्या चरणांच्या केलेल्या पूजेचे महत्व (महात्मनां अवदत्) महान् पुरुषांना दाखविता झाले.

मगधदेशातील राजगृह नगरात श्रेणिक राजा राज्य करीत होता. त्याच शहरात नागदत्त नांवाचा सावकार आपल्या भवदत्ता नामक स्त्रीसह राहत असते. तो कही दिवसांनी आर्तपरिणामाने मृत्यू पावला मरणोत्तर आपल्याच घरातील विहिरीत बेडूक गेऊन जन्मला. एके दिवशी भवदत्ता विहिरीवर गेली असता त्याला आपली ती स्त्री पाहून जातिस्मरण झाले. पूर्वभावातील स्नेहाने तो ओरडत तिच्याजवळ येऊ लागला त्या स्त्रीने दोन चार वेळा त्याला आपल्या अगावरून काडून लावले तरी तो पुन: तिजडवळ येऊ लागला. पाहून त्याला दूर लोटून ती घरी आली. पूढे एके दिवशी तिने सुव्रतनामक अवधिज्ञानी मुनींना विचारले की, ((माझ्या घरातील विहिरीमध्ये एक बेडूक आहे, तो मला ज्यावेळी पाहतो त्यावेळी शब्द करीत करीत माझ्याजवळ येतो याचे काय कराण असावे( त्याचा माझा पूर्व जन्मीचा काहीं संबंध आहे काय ते कृपा करून सांगा.(( मुश्वर म्हणाले - (( बाले, तो बेडून तुझा पती नागदत्ताचा जीव आहे. नागदत्त आर्तपरिणामात मरण पावल्याने बेडूक होऊन जन्माला आहे. त्याला जातिस्मरण झाले आहे. त्यामुळे तो पूर्वजन्मीच्या स्नेहाने तुजजवळ येत आहे.(( याप्रमाणे यतीच्या मुखाने बेडकाचा वृत्तांत ऐकून भवदत्ताने बेडकाला आपल्या पतीचा जीव जाणून घरात नेऊन ठेवले. एके दिवशी वैभारपर्वतावर भगवान् महावीर तीर्थकराचे समवसरण आल्याचे श्रेणिक राजाला समजल्यावरून त्याने शहरात वंदन करण्यास निघाले, त्या सर्वांच्य जयजयकार शब्दांनी व वाद्यगायनांच्या शब्दांनी सर्व शहर आनंदात गजबजून गेले. त्या बेडकालाही लोकांचा हा जयजयकाराचा आनंदधयानि एकून आपणही नंदन करण्यास जावे असे वाटले व तो एक पुष्प आपल्या मुखात धरून आनंदाने उड्या मारीत भगवंताला वंदन करण्याकरिता निघाला, त्यावेळी विपुलाचलपर्वतावर वीस हजार पायऱ्या चढून आपण समवसरणात कसे पोहोचू ( असा विचार त्याच्या मनात आला नाही. अतिशय भक्तीने मनात जिनेश्वराला जाऊन वंदन करू व त्यांचे पूजन करू असाच विचार करीत रस्त्याने जात असता तो श्रेणिक राज्ाच्या हत्तीच्या पायाखाली सापडून मरण पावला व सौधर्म स्वर्गात महान् ऋध्दिधारक देव होऊन जन्मला. (( आपण पूजन प्रभावाने देव होऊन जन्मलो. (( असे त्याने अवधिज्ञानाने जाणले व आपल्या ध्वजेवर बेडकाचे चिन्ह लावून तो तत्काल वीरजिनाच्या समवसरणात दर्शनसाठी गेला. बेडकाने साक्षात पूजन असून केलेही नव्हते - केवळ पूजा करण्याचा विचार त्याच्या मनात होता. तरी त्या विचारप्रभावाने तो महर्ध्दिकदेव झाला.

जिनपूजनाचा असा अचिंत्य प्रभाव आहे. म्हणून गृहस्थाश्रणात पूजनाला इतके महत्व दिले आहे. पूजन परिणामांची अतिशय निर्मलता करणारे आहे, हे जाणून श्रावकांनी ते नित्यश: केले पाहिजे. जिनपूजन निर्धन व धनाढ्या दोघांनाही करता येते. आपल्या सामर्थ्याप्रमाणे पूजन साहित्य घेऊन पूजन करावे. पूजन करणे, करविणए व करण्यास चांगले म्हणणे या तिन्हीला पूजन म्हणतात. याचप्रमाणए स्तवण करणे, वंदन करणे हेही पूजन आहे. एकाच द्रव्याने भगवंताला अर्ध्य देणे हे देखील पूजन होय. जसजशी अरिहंताच्या गुणावरील भक्ती मध्ये निर्मलता असेल तसतशी तया् पूजनापासून फलप्राप्ती होत असते. जिनमंदिरात छत्र, चामर, सिंहासन, कलश, घंटा वगैरे उपकरणे, सोन्याची, रुप्याची पितळेची, तांब्याची, कशाची जशी शक्ती असेल त्याप्रणो लावून मंदिर सुशोभित करणे हे मंदिराचे वैयावृत्य आहे. जीर्ण मंदिरांची दुरुस्ती करिवणे हेही वैयावृत्य आहे. धनवान पुरुषांनी जिनिबंबाची प्रतिष्ठा करिवणे, नवीन मंदिर बांधिवणे, कलश चढविणे हे अरिहंताचे वैयावृत्य आहे. मंदिराची्वस्था पाहणे, ते कोमल अशी पिंछीने हळूच झाडून काढणे, अभिषेक पूजेकरिता पाणी आणून सामग्री धूऊन तयार करणे, पूजन-प्रक्षालाची भांडी स्वच्छ करणे, बिछायत घालणे, गानवादित्रनृत्य करून भगवांचा गुण गाणे ह्या सर्व् क्रिया अरिहंताच्या वैयावृत्यात मोडल्या जातात. मनाने, वाणीने, शरीराने, धनाने, विद्येने, व कलेने होईल तितकी, सेवा करून अरिहंताच्या गुणावर प्रीती वाढेल असे करीत रहावे. धन प्राप्त होणे, निरोग शरीर प्राप्त होणे, सर्व इंद्रियांची अनुकूलता असणे, शक्ती असणे, ज्ञान असणे  या सर्व गोर्ष्टीची सफलता अरिहंताचे वैयावृत्य करण्यानेच होणार आहे. वैयावृत्यापासून सम्यक्त्व व सम्यग्ज्ञान प्राप्त होते. मिथ्याज्ञान व मिथ्याश्रध्दान यांचा अभाव होतो, स्वाध्याय, संयम, व्रत, शील, तप वगैरे गुण जिनमंदिराची सेवा करण्याने प्राप्त होतात. नरकगति, तिर्यचगति, वगैरे मध्ये परिभ्रमण करण्याचा त्रास यापासूनच नाहीसा होतो. जिनमंदिरासारखा उपकार करणारा दुसरा पदार्थ नाही. जिमंदिराच्या निमित्ताने शास्त्रश्रवण व पठन घडूनअनेक श्रोते व वक्ते याजवर उपकार घडतो. जिनमंदिर असेल तर कित्येक जीव कार्योत्सर्ग, जप जाप्य, रात्रो जागरण, पूजन, स्तवन, सत्त्वचर्चा, प्रोषधोपवास, बेले, तेले, पंचोपवास वगैरे करून कर्मांची निर्जरा करतील. कित्येक भजन, नर्तन गान करून प्रण्योपार्जन करतील. कोणी स्वाध्याय, कोमी धर्मध्यान, कोणी वीतराग भाव धारण करतील.कोणी मंदिरात अनेक प्रकारची उपकरणे ठेवून प्रभावना करतील. जिमंदिरात स्वाध्यायाच्या निमित्ताने पापपुण्य, देव-कुदेव, धर्म-कुधर्म, गुरु-कुगुर यांचे ज्ञान होते. भक्ष्याभक्ष्य, कार्याकार्य हेयाहेय यांचेही ज्ञान होते. म्हणून जिनमंदिरासारखी उपकारक दुसरी वस्तू नाही. हे अशरणाला शरण आहे. याप्रमाणे परोपकार करणारे जिनमंदिर जाणून त्यची सेवाव रक्षण करावे.

वैयावृत्त्याचे पाच अतिचार

हरितपिधानिनधाने ह्यनादरास्मरणमत्सरत्वानि ।

वैयावृत्यस्यैते व्यतिक्रमा: पंच कथ्यन्ते ।। १२१ ।।

अन्वयार्थे - (वैयावृत्त्यस्य) वैयावत्तयाचे (हरितपिधाननिधाने) हरितपिधान, हरितिनधान, (हि अनादर-अस्मरण-मत्सरत्वानि) अनादर, असम्रण, मत्सभाव (एते) असे (पंच) पाच (व्यतिक्रमा:) अतिचार (दोष) (कथ्यन्ते) सांगितले आहेत.

व्रती पुरुषांना देण्यायोग्य जो आहार तो रिव्या कमलाच्या पानात अथवा दुसऱ्या कोणत्याही सचित्त पानाखाली झाकून देणे हा हरितपिधान नामक अतिचार आहे.

सिचत्त पात्रामध्ये ठेवून तो आहार देणे याला हरितनिधान नामक अतिचार म्हणतात.

दान देत असता मनात आदरबुध्दी नसणे, ते अविनयाने अथवा प्रयवचन व बोलता देणे याला अनादरातिचार म्हणतात.

पात्राला दान देण्याची योजना करून दुसऱ्या कामाच्या नादात ते विसरणे अथाव देण्या योग्य द्रव्य आणि विधी यांचा विसर पडणे याला अस्मरणातिचार म्हणतात.

दुसरा कोणी दान देत आहे हे पाूहन ईर्षेने आपणही दान देणए याला मत्सरत्व अतिचार म्हणतात.

याप्रमाणे पाच दोष टाळून विनयपूर्वक शुध्द दान द्यावे.

याप्रमाणे श्रीसमंतभद्रचार्यनी रचिलेल्या रत्नकरंड श्रावकाचाराती शिक्षाव्रताच्या वर्णनाचा चौथा अधिकार संपला.

५ भावनाधिकार

यानंतर परमनिर्ग्रंथ गुरूंच्या प्रसादाने व परमागमाच्या आज्ञेला अनुसरून भावना नांवाचा महाधिकार सांगतो. सर्वत: धर्माचे मूल भावना (चिंतन) आहे. भावनेपासून परिणाम निर्मलपणा प्राप्त होतो. भावनेपासून मिथ्यादर्शनाचा अभाव होतो. भावनेपासून व्रतामध्ये दृढपणा उत्पन्न होतो. भावनेपासून वीतरागतेची वृद्धी होते. भावनेपासून अशुभध्यानाचा अभाव होऊन

शुभध्यानाची पुष्टी होते व भावनेपासून आत्म्याचा अनुभव येतो. याप्रमाणे हजारो गुण भावनेपासून उत्पन् होतात, म्हणून सदाकाल व्रतपालनात दोष लागणार नाहीत अशी भावना (चिंतन) करीत राहिले पाहिजे.

प्रथमत: पाच व्रतांच्या पंचवीस भावना आहेत त्या अशा-

## अहिंसाव्रताच्या भावना

अहिंसा अणुव्रत धारण करणाऱ्याने खालील पाच विषयांचे दोष घडू नयेत असे चिंतन करावे.

१) मनातून अन्याय्य विषयभोगांच्या इच्छेचा अभाव करून, दुष्ट संकल्प नाहीसे करणे, मोठेपणाची इच्छा न धरणे व अन्य जीवांना विघ्न येवो, त्यांना इष्टवियोग प्राप्त होवो, त्यांचा मानभंग व तिरस्कार होवो व त्यांच्या धनाचा नाश होऊन रोगप्राप्ती होवो- अशा प्रकारची इच्छा न ठेवणे ही पहिली मनोगुप्ति भावना आहे.

२) थट्टेचे, वादविवादाचे, अभिमानाचे व कलह उत्पन्न करणारे भाषण न बोलणे ही वचनगुप्ति भावना.

३) त्रस जीवांची विराधना न व्हावी म्हणून हिरव्या गवताच्या व चिखलाच्या वगैरे जागेवरून जाणे, चढणे, उतरणे, उल्लंघन करणे वगैरे क्रिया अत्यंत सावधगिरीने करणे व आपल्या हस्तपादादिक इंद्रियांपासून कोणाही इतर जीवांना त्रास होणार नाही व ते नाश पावणार नाहीत अशा रीतीने त्याचे हलनचलन करणे यास ईर्यासमिति म्हणतात. याप्रमाणे सावधानपूर्वक क्रिया करण्याविषयी चिंतन करणे ही ईर्यासमिती भावना होय.

४) अन्न, पान, वस्त्र, आसन, शय्या, काष्ठा, पाषाण, मातीची व सोने, चांदी पितळ काशांची भांडी, तूप व तेल वगैरे रस हे गृहस्थाचे परिग्रह आहेत. त्यांना नेहमी एका जागेतून दुसऱ्या जागेत न्यावे लागते, ठेवावे लागते व त्यांचा नेहमी गृहस्थाला उपयोग करून घ्यावा लागतो. अशा वेळी या क्रियेपासून इतर कोणत्याही जीवाला बाध होणार नाही अतवा हे आपल्या हातून निसटून पडल्याने कोणाही जीवांचा घात होणार नाही, अशा हुशारीने नेणे, आणणे, उचलणे याल ाआदाननिक्षेपणसमिती म्हटले आहे. निष्काळजीपणाने हे पदार्थ जमिनीला घासून ओढून घेऊ नयेत. अशा वेळी कोणा तरी जीवाचा घात न होईल हा विचार मनात बाणण्यासाठी या भावनेचे चिंतन करावे.

५) भोजनपान करणाऱ्या गृहस्थाने बाह्य-अभ्यंतर द्रव्यक्षेत्रकालभाव यांच्या योग्यायोग्यतेचा व आपल्या प्रकृतीचा विचार करून योग्य असेल तितकेच अन्न ग्रहण करावे. दिवसा प्रकाशात वरचेवर पाहून, वारंवार शोधून हळूहळू घास तोंडात घेऊन अन्न भक्षण करावे. हावरेपणामुळे गडबडीने न पाहता, न शोधता भोजन करू नये. याला आलोकितपानभोजन भावना म्हणतात.

या प्रमाणे अहिंसा अणुव्रताच्या पाच भावना आहेत. यांचे कधी विस्मरण पडू देऊ नये.

सत्यव्रताच्या भावना

सत्याणुव्रताच्या पाच भावना, क्रोधत्याग, लोभत्याग, भीरुत्वत्याग, हास्यत्याग आणि अनुवीचिभाषण अशा आहेत.

१) ज्याला सत्याणुव्रत धारण करावयाचे आहे त्याने क्रोध करण्याचा त्याग केला पाहिजे. कारण राग आला असता जे वचन मुखावाटे निघते ते खरे असू शकत नाही. मनात क्रोध नसेल तर सत्यव्रत पाळले जाते. कर्मोदयाने गृहस्थाला मनाविरुद्ध कारणामुळे क्रोध उत्पन्न झाल्यावेळी ((यावेळी माझ्या परिणामात क्रोधजनित लहरी उत्पन्न झाल्या आहेत. आता मला मौन धरणे योग्य आहे, यावेळी अधिक न बोलण्याने कषाय व विसंवाद (खोटा वादविवाद) वाढणार नाही व माझा गुण नष्ट होणार नाही. म्हणून जोपर्यंत क्रोधरूप अग्नीचा उपशम झाला नाही तोपर्यंत बोलू नये हे उत्तम,(( याप्रमाणे विचार ज्याच्या मनात उत्पन्न होतात त्याला क्रोधत्याग भावना घडते.

२) लोभ असेल तर सत्यव्रत पाळले जाणार नाही. म्हणून अन्याय लोभाची आशा मनामध्ये उत्पन्न होऊ न देणे, आपण सत्व्रती असल्याने कोणाचेही खोटे बोलून नुकसान केले नाही, त्याअर्थी आपले कोण नुकसान करू शकणार( आपण कोणाचीही भीती बाळगणार नाही अशी ही लोभत्याग भावना आहे.

३) ज्याला भय उत्पन्न झाले असेल त्याला सत्यव्रत पाळले जात नाही. म्हणून भयत्याग भावनेचे चिंतन करावे म्हणजे निर्भयता प्राप्त होते.

४) थट्टेमध्ये खरे बोलले जात नाही म्हणून हास्य करण्याचा त्याग केला पाहिजे.

५) जिनसूत्राच्या विरूद्ध भाषण करू नये. जिनसूत्राला अनुसरून बोलण्याचा विचार नेहमी मनात बाळगणे ही अनुवीची भावना जाणावी.

भावार्थ - ज्याला आपले सत्यव्रत पाळावयाचे असेल तो क्रोध उत्पन्न होण्याच्या अनेक कारणापासून दूर राहील. ज्या लोभामुळे अनेक प्रकारच्या सत्याची प्रवृत्ती होते अशा लोभाचा त्याग करील. सत्य भाषणाने व लोकविरुद्ध बोलण्याने शरीर व धनाचा नाश होईल अशी भीती बाळगणार नाही. सत्वादीपणा कायम ठेवू इच्छिणारा दुसऱ्याची थट्टा करणार नाही व जिनसूत्राविरुद्ध कधी भाषण करणार नाही.

## अचौर्यव्रताच्या भावना

अचौर्य अमुव्रताच्या पाच भावना- शून्यागार निवास, विमोचितावास, परोपरोधारण, भैक्षयशुद्धि व सधर्माविसंवाद या पाच भावना अचौर्यव्रताच्या आहेत. अचौ४यव्रत धारण करणाऱ्या गृहस्थाने यांचे नेहमी चिंतन करावे.

१) व्यसनी, दुष्ट, कलहप्रिय माणसे जेथे येणार नाहीत अशी जागा आपणास सदैव राहावयास असावी असा विचार मनात ठेवणे यास शून्यागार निवासभावना म्हणतात. कारण असा लोकाजवळ बसण्या-उठण्याने परिणामाची शुद्धता नाहीशी होऊन दुर्ध्यान प्रगट होते. म्हणून लोकांनी शून्य असलेल्या घरात राहणे योग्य आहे.

२) घरात परस्पर कलहाचा प्रसंग येणार नाही अशा दुसऱ्यांनी सोडलेल्या घरात राहणे याला विमोचितावास - भावना म्हणतात.

३) दुसरा आपल्या जागेवर बळजबरीने घुसून बसण्याचा विचार करीत असेल त्याला अडथळा न करणे परोपरोधाकरण भावना म्हणतात.

४) अन्याय व अभक्षयाच्या त्याग करून भोगांतरायाच्या क्षायोपशयमाप्रमाणे प्राप्त होणाऱ्या सरस-नीरस भोजनात संतोष मानून ते ग्रहण करणे याला भैक्षयशुद्धिभावना म्हणतात.

५) समानधर्मी पुरुषांमध्ये वादविवाद न करणे या सधर्माविसंवाद भावना म्हणतात.

## ब्रह्मचर्यव्रताच्या भावना

ब्रह्मर्चयव्रताच्या भावना स्त्रीरागकथाश्रवणत्याग, स्त्रियांचे मनोहर अंगनिरीक्षण त्याग, पूर्वी भोगलेल्या भोगांचे स्मरण करण्याचा त्याग, पौष्टिक बोजन व इंद्रियामध्ये दर्प उत्पन्न करणाऱ्या अन्नाचा त्याग आणि आपले शरीर सजविण्याचा त्याग अशा पाच आहेत.

१) इतर स्त्रियांबरोबर रागभाव उत्तन्न होण्यासारख्या गोष्टी बोलण्याचा व ऐकण्याचा त्याग करावा.

२) इतर स्त्रियांच्या शरीराच्या अवयवाकडे व मुखाकडे रागभावाने पाहण्याचा त्याग करावा.

३) अव्रती असताना ज्या विषयांचा उपभोग घेतला होता त्याचे अणुव्रत धारण केल्यावर स्मरण करू नये.

४) पौष्टिक आणि कामोद्दीपक गरिष्ट पदार्थांचे भोजन करू नये.

५) आपल्या शरीरावर फुलांचे हार, सुंदर कपडे वगैरे कामविकार उत्पनन करणारे अलंकार वगैरे घालून सजवू नये.

परिग्रहप्रमाणाच्या भावना

परिग्रहत्यागाच्या पाच भावना-ज्याने पिरग३हप्रमाण अणुव्रत धारण केले असेल त्याने -

१) पाप बंधाला कारण अशा अन्याय अभक्ष्यांचा यावज्जीव त्याग केला पाहिजे.

२) आपल्या अंतराय कर्माच्या क्षयोपशमाप्रमाणे प्राप्त होणाऱ्या पंचेंद्रियांच्या विषयात संतोष ठेवला पाहिजे.

३) आपल्याला आवडणाऱ्या वस्तूवर अतिशय प्रीती करण्याचे सोडले पाहिजे.

४) अप्रिय वस्तूविषयी द्वेष उत्पन्न होऊ न देण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

५) अन्य जीवांना सुंदर विषयोपभोग प्राप्त होत आहेत हे पाहून त्याप्रमाणे आपणासही प्राप्त व्हावेत अशी इच्छा करू नये. याप्रमाणे परिग्रहप्रमाणव्रताच्या ह्या पाच भावना आहेत.

पंच पापे महानिंद्य आहेत असे सदैव चिंतन करावे. पंचपापापासून इहलोकी महान दु:ख प्राप्त होऊन आपला नाश होतो व परलोकी अनेक जन्मापर्यंत घोर दु:ख प्राप्त होते असे जाणून यापासून भयभीत राहावे. हिंसा करणाऱ्याला नेहमी भय वाटत असते. तो ज्याला मारतो त्याचे अनेक जन्मापर्यंत वैरसंस्कार चालू राहतात. ज्याला मारले असेल त्याचे स्त्री, पुत्र, मित्र कुटुंबी वैर साधून घेतात. पशूला काठी, दगड, शस्त्र, चाबूक वगैरेनी आपण मारतो, त्याचे वैर ते देखील सोडीत नाहीत. हत्ती, घोडा, उंट हे पुष्कळ दिवसपर्यंत वैर ठेवून त्याचा बदल घेतात.

जगात सर्व लोक त्यास पापी म्हणू लागतात. सर्वांच्या भरवसा नाहीस होतो. ज्याला ापण मारतो तो आपणास मारू न बदला घेतो. राजाची कडक शिक्षा सोसावी लागते. हात, पाय, कान, नाक, हे तोडले जातात. राजा सर्वस्व हरण करतो. अपकीर्ती होते. गर्दभारोहण वगैरे तीव्र दंड भोगून नरकादिक कुगतीमध्ये पुष्कळ कालपर्यंत ताडन, मारण, छेदन, भेदन, शूलारोहण, वैतरणीमज्जन वगैरे दु:ख भोगावे लागते. मनुष्य व तिर्यंचयोगीत घोरण दु:ख, दारिद्र्य व अपमान भोगावे लागतात. असंख्यात काल व अनंतभवापर्यंत संसारातून सुटका होत नाही. जो अन्य जीवांचा घात करीत नाही पण अभिमानाने, क्रोधाने, आपल्या शरीरातील बलामुळे अन्य मनुष्य तिर्यंचाना अथवा बालक, स्त्री यांना लाथाबुक्यानी मारू न अनेक प्रकारचे त्रास देतो, तो इहलोकी राक्षसासारखा भयंकर प्राणी मानला जातो. निर्दयपरिणाांनी विकलत्रय जीवांचा घोर आरंभादिक करू न जो घात करतो व प्रयोजनावाचून वनस्पतिच्छेदन करतो व पृथ्वी, जल, अग्निकाय जीवांची अज्ञानाने अथवा प्रमादाने विराघना करतो त्याला इहलोकी ज्वर, न्निपात, आमवात, पक्षावात, संग्रहणी, अतीसार, वात, पित्त, कफ, श्वास, खोकला, कोड, खाज वगैरे रोगांनी घोर दु:ख प्राप्त होते. सारांश इ हिंसेपासून इहलोकी भयंकर दु:ख प्राप्त होते असे जाणून तिचा सर्वस्वी त्याग करावा.

जीवदयेने ज्याचे अंत:करण ओले झाले असेल तो सर्व जीवांना अभयदान देतो. जो आपल्या परिणामाने कोणत्याही जीवाची विराधना करू इच्छीत नाही व तसे न व्हावे म्हणून मोठ्या सावधचित्ताने प्रयत्नपूर्वक आपली क्रिया करतो व अहिंसाधर्माला विसरत नाही त्याचा महिमा इहलोकी देव करतात. तो सर्वांना पूज्य होतो. सर्व पापापासून मुक्त होऊन स्वर्गलोकी महर्द्धिक देव होतो. तेथून मु्‍यलोकी अथवा विदेहादिक उत्तमक्षेत्रात महाप्रभावशाली पुण्यपुरुष होऊन क्रमाणे निर्वाण प्राप्त करू न घेतो. असत्य बोलण्यापासून अनेक दोष घडतात. असत्य भाषण करणाऱ्याचा कोणालाही भरवसा येत नाही. इतरांना तर राहो पण प्रत्यक्ष त्याच्या आई, बाप, मुलगा, मित्र, स्त्रीला देखील त्याचा विश्वास नसतो. मग दुसऱ्याला नसेल यात नवल काय( जगातील सर्व व्यवहार वचनावर अवलंबून चालतात. जर आपण ते सांभाळले नाही तर आपल्या सर्व व्यवहारात अविश्वास उत्पन्न होतो. धर्म, अर्थ, काम, आणि मोक्ष हे चार पुरुषार्थही वचनावरच आधारलेले आहेत. तो मूल आधारच पाळला गेला नाही तर उन्नतीचा पायाच नाहीसा होतो. असत्यवादी मनुष्य सर्वांना अप्रिय असतो. तो महान कपटी असतो. ्सत्य आणि कपट यामध्ये अविनाभावी संबंध आहे. म्हणजे असत्य आहे तेथे कपट असतेच. ते एकमेकाला सोडून कधीही राहात नाहीत. खोटे बोलणे, चहाडी करणे, विकथा सांगणे, आत्मप्रशंसा व परनिंदा करणे हा सर्व असत्याचा परिवार आहे. असत्यवादी माणसाला इहलोकी देखील जिव्हाछेदन,

सर्वस्वहरण, जिव्हारोगासारखे अनेक विकास होऊन दु:ख प्राप्त होते. अनेक अपवाद येतात. परलोकी नरकादि गतीमध्ये परिभ्रमण, तिर्यंचगतीत वचनाची शक्ती नसणे व मनुष्यगतीत बहिरेणा, मुकेपणा, अंधपणा, दारिद्र्य वगैरे प्राप्त होते, म्हणून खोट्या भाषणाचा त्याग करावा.

सत्य भाषणाच्या प्रभावाने स्वर्गात महर्द्धिक देवांमध्ये जन्म होतो. सत्य वचनाची सर्व जगात मान्यता होते. सत्यवादी मनुष् संपूर्ण शास्त्रपारगामी बनतो. तो कवी व वक्ता बनून अनेक जीवांवर आपल्या भाषणप्रभावाने उपकार करणारा बनतो. सत्यवचनापासून हजारो, लाखो जीव त्याचे अनुयायी बनतात. ज्याने आपले वचन निर्मल ठेवले असेल त्याचे भाषण ऐकण्याची सज्जन माणसे अभिलाषा करीत असतात.

चोरीच्या दोषांचा विचार करताना, चोर हा सर्वांच्या मनात भीती उत्पन्न करतो. आईलाही चोरी करणाऱ्या मुलाची भीती वाटते. हितमित्र, बांधव वगैरे कोणीही चोर मनुष्याशी संबंध ठेवीत नाहीत. चोराच्या संगतीपासून आपणाला कलंक लागेल, राजाधिकाऱ्याकडून काही संकट उत्पनन होईल व तो आमचे स्वत:चे काही तरी नेईल अशी भीती मनातून नाहीशी होत नाही. चोर हा सर्वात नीच मानला गेला आहे. त्याबद्दल कोणालाही दया वाटत नाही. असत्य, कपट, छल, वगैरे सर्व दुर्गुण चोराच्या ठायी भरलेले असतातच. चोर हा पापी लोकातला महापापी जीव आहे. त्याला कोणी सहाय होत नाही. आई, बाप, भाऊ, मुलगा, स्त्री वगैरे सर्व कुटुंबापैकी कोणीही त्याला साहाय्य होत नाहीत. चोरांची अब्रू नाहीशी होते. त्याला कोणी आपल्याजवळ येऊ देत नाही. कदाचित काही मिषाने तो घरात शिरला तर त्यास मारून काढून लावतात. राजाही त्याला पकडून मारण, ताडन, हस्तनासिकाछेदन वगैरे तीव्र दंड देतो. कैदेत पुष्कळ दिवस राहिल्याने त्यांची किंमत नाहीशी होते. मरणोत्तर त्याला नरकातील घोर वेदना असंख्यातकालपावेतो भोगाव्या लागतात. अनंतकाल तिर्यंचयोनीत तहान, भूक, ताडन, मारण वगैरे दु:ख सहन करावे लागते. कदाचित मनुष्योनीत जन्मला तरी तो नचकुलात जन्म घेतो. तेथे दारिद्र्य, रोग, वियोग, क्षुधा, तृषा वगैरे दु:ख प्राप्त होते. पदोपदी याचनेचे दु:ख व अपमान सहन करावा लागतो. म्हणून चोरी करण्याच्या अजीबात त्याग करावा. आपल्या पुण्यपापाला अनुसरून जेवढे प्राप्त होईल त्यास संतोष मानून राहावे. दुसऱ्याच्या धनाची स्वप्नात देखील इच्छा करू नये. पुण्याशिवाय द्रव्य प्राप्त होणार नाही( पूर्वीजन्मी कुपात्रदान, कुतपश्चरण केल्याने कदाचित धन प्राप्त झाले तरी त्याचा फारच थोडा उपभोग घेता येतो. सेवटी दु:ख भोगून दुर्गतीला जावे लागते. ज्यांना परधनाची इच्छा नाही व आपल्या पुण्याप्रमाणे प्राप्त होईल, त्यात संतोष ठेवून अन्यायाने धन प्राप्त करून घेण्यासाठी ज्याचे चित्त चलायमान होत नाही त्यांची इहलोकी कीर्ती होते, मान वाढतो व पत वाढते. ज्याला परधन ग्रहण करण्याची इच्छा

नसून स्वोपार्जित धनाचाही अभिमान वाटत नाही त्याला कसलेही दु:ख प्रापत् होत नाही व अशुभकर्माचा बंध पडत नाही. परलोकी देवलोकातील अलौकिक विभूती असंख्यातकाल भोगून पुन: मनुष्यजन्मात राजाधिकराज, मंडलेश्वर, चक्रवर्तीचे वैभव प्राप्त होऊन तो क्रमाने मोक्षा गाठू शकतो. याकरिता भगवान् वीतरागाचा धर्म धारण करून अन्यायाने धन ग्रहण करण्याचा त्याग करावा.

व्यभिचारी पुरुष काममदाने उन्मत्त होऊन मदोन्मत्त हत्तीसारखा अविचारी होतो. स्त्रीवरील प्रेमाने वेडा झाल्यामुळे इहपरलोकांचा त्यास विचार राहात नाही. भक्ष्याभक्ष्य व योग्यायोग्य विचारापासून तो परावृत्त होतो. तो पापपुण्याला भीत नाही.`प्रत्यक्ष संकट आले व अपकीर्ती होत असलेली प्रत्यक्ष दिसत असली तरी त्याला ती दिसत नाही. कामासारखी दुसरी गाढ धुंदी त्रैलोक्यात नाही. कामपीडित मनुष्य पशूसारखा बनतो. पशूमध्ये व कामान्धामध्ये फरक नाही. कामान्ध बनल्याने पशू झुरून मरतात. त्याप्रमाणे यालाही मनुष्यजन्मात मरण प्राप्त होते. कित्येक आत्मघात करून घेतात. कामान्धाला धर्माधर्म विचार राहात नाही. त्याची लोकलज्जा समूळ नष्ट होते. परस्त्रीलंपटाला अनेक दु:खे प्राप्त होतात. राजा लिंगच्छेदन करून त्याचे सर्वस्व हरण करून घेतो. मरणानंतर नरकादिक दुर्गतीमध्ये परिभ्रमण करावे लागते. तिर्यंच मनुष्ययोनीत चांडाल, चांभार, धीवर, महादरिद्री, कुरूप, कोड फुटलेला, अवयवहीन, आंधळा, लंगडा, पांगळा, कुबडा वगैरे बनून अनेक दु:खे प्रापत् होतात. त्यामुळे पुन: नरक, तिर्यंच, कुमानुष्, नपुसकादि योनीत जन्म घ्यावा लागतो. म्हणून व्यभिचाराचा त्याग करावा. शीलवान माणसाची स्वर्गलोकी कोट्यावधि अप्सरा सेवा करतात. त्याठिकाणी त्याला असंख्यात कालपर्यंत सुख प्राप्त होऊन मनु्यजन्मात श्रेष्ठपणा प्राप्त होतो व क्रमाने तो संसारमुक्त होतो.

यानंतर पपिग्रहावरील ममतेच्या दोषांचा विचार करून त्यापासून विरक्त होणे श्रेष्ठ आहे. परिग्रहावरील ममता पंच पापामध्ये प्रवृत्त करवित. परिग्रहाने तृप्ती होत नाही. इंधनाच्या योगाने अग्नी वृद्धिंगत होतो तसे तृ्णारूप अग्नी परिग्रहामुळे सदैव वाढत असतो. परिग्रह उपार्जन करण्यात, रक्षण करण्यात, ्त्यंत परिश्रम करावे लागतात व त्यांचा नाश झाला असता अतिशय दु:ख होते. परिग्रहावर ज्याला अति प्रेम आहे. त्याला धर्म-अधर्माचा व जीवन-मरणाचा विचार राहात नाही. परिग्रहावरील प्रीतीपासून हिंचा, चोरी, असत्य, कुशील, अभक्ष्य, बहु आरंभ, वैर, ईर्ष्या, भय, शोक, संताप इत्यादि हजारो दोष उत्पन्न होतात. संसारातील बंधन, पराधीनता, कषाय व दु:ख हे सर्व परिग्रहावरील ममतेपासून होते. परिग्रहाचा त्याग करणे म्हणजे डोकीवरील मोठे ओझे कमी करण्यासारखे आहे. ज्याने परिग्रहाचा त्याग केला त्याला बंध

होत नाही. परिग्रहाच्या त्यागाचे फल स्वर्ग व मोक्षा आहे. म्हणून परिग्रहत्याग सर्व कल्याणाचे मूल आहे.

हिंसा, असत्य, चोरी, कुशील व परिग्रह यातील दोषांचा विचार करावा. ही पंच पापे केवळ दु:ख आहेत असे नेहमी चिंतन करावे. हिसादिक ही दु:खाला कारण आहेत. म्हणून ही पंच पापे ही दु:खच आहेत. कारणाच्या ठिकाणी कार्याचा उपचार करून दु:खाची ी कारण त्यांना दु:खच म्हटले आहे. ज्याप्रमाणे बंधन व पीडन आपणास अप्रिय आहेत, तसेच सर्व जीवांनाही ती अप्रियच आहेत. जसे खोटे, कडू व कठोर वचन आपणाला आवडत नाही, तसेच सर्व जीवांनाही ते आवडत नसते. त्याचे श्रवण करण्याने जसे आपणाला दु:ख उत्पन्न होते तसेच इतर लोकांनाही दु:ख होते. आपल्या स्त्रीकडे कोणी पापदृष्टीने पाहू लागला तर त्यापासून जशी आपणास मानसिक पीडा होते, तशीच इतर प्राण्यांनाही आपल्या स्त्री, माता, बहीण, मुलीच्या व्यभिचाराच्या गोष्टी ऐकून होत असते. वस्त्र-प्रावरण, धन-धान्यादि न मिळाल्याने अथवा मिळालेले नाहीसे झाल्याने आपणास दु:ख होते, तसेच परिग्रहाच्या इच्छेने व परिग्रह नष्ट होण्याने सर्व जीवांना दु:ख होते. यासाठी हिंसादिक पंच पातकापासून विरक्त होणे यातच जीवाचे कल्याण आहे.

सुंदर स्त्रियांच्या स्पर्शापासून सुखाचा अनुभव येत असताना ते दु:खकारक आहे असे कसे म्हणता येईल( वस्तुत: इन्द्रियांच्या विषयापासून उत्पनन होणारे खरे सुख नव्हे, तो सुखाभास आहे. आधी विषयांची इच्छा होते मग ती दूर करण्याकरिता इलाज करावा असे वाटते. शरीरातील रक्तामध्ये विकार झाल्याने खाज उत्पन्न होते. ती शमविण्यासाठी नखाने आपण खाजवू लागतो. याप्रमाणे खाजवीत असता शरीरातून रक्त निघाले तर सुख झालेसे वाटते. याप्रमाणे मैथुन सेवन करणारेही मोहाने दु:खालाच सुख मानतात. मनुष्य, तिर्यंच, असुर, सुरेंद्र वगैरे सर् वही जीव आपल्या शरीराबरोबर उत्पन्न झालेल्या विषयाचे दु:ख सहन करण्यास असमर्थ असल्याने विषयांच्या उपभोगाकडे प्रवृत्त होतात. अग्नीने तप्त झालेल्या लोखंडाच्या गोळ्याप्रमाणे इंद्रियांच्या तापाने संतप्त झालेला आत्मा अतितृष्णेपासून झालेले दु:ख सहन न झाल्यामुळे विषयोपभोगात तल्लीन होतो. चोहोंबाजूनी अग्नीच्या ज्वालेमुळे संतप्त झालेला पुरुष दुर्गंधीने भरलेल्या पाण्याच्या खड्ड्यात पाडून आपला संताप नाहीसा जाला म्हणून क्षणभर सुख मानून मरण पावतो. तद्वत संसारी जीव स्पर्शनेंद्रियाच्या इच्छारूपी संतापाला सहन करण्यात असमर्थ झाल्याने स्त्रियांच्या मलिन अशा देहाचा भोग घेऊन कामसंतापापासून सुख झाले असे मानतो. पण अतितृष्णेमुळे प्राप्त झालेल्या दु:खाने झिजून मरण पावतो. जीवाला इंद्रिये ही सतत दु:ख देणारा महान रोग आहे. त्यावर विषयोपभोग हे थोडा वळ दाहनमन करणारे औषध आहे.

मनुष्यप्राणी यालाच भ्रमाने दु:खमोचनाचा इलाज मानीत आहे. इंद्रिये आहेत तोपर्यंत दु:ख कायमचे आहे. तसे नसते तर विषयोपभोग प्राप्त करू न घेण्यासाठी आपल्या प्राणापलीकडे कोणी धडपड केली असती( वनावट हत्तिणीला स्पर्श करण्याच्या इच्छेने रानातील हत्तीला स्पर्शनेंद्रियाच्या तापामुळे खोल खड्ड्यात पडावे लागून चिरकाल पारतंत्र्य सोसावे लागते, हे आपण प्रत्यक्ष पाहतो ना( चपल असे मासे रसनेंद्रियाच्या वश होऊन धीवराने पसरलेल्या जाळ्यात लोखंडी काट्याला अडकून प्राणरहित होतात ना( घाणेंद्रियाच्या वेदनेने भ्रमर हा संकुचित होणयाच्या बेतात आलेल्या कमळावर सुगंध ग्रहण करण्याच्या इच्छेने बसून मरण पावतो ना( नेत्रेंद्रियाच्या संतापाने पतंग दिव्याच्या ज्वालेवर पडून जळून जातात नाय कर्णेद्रियाच्या वश होण्याने हरणे गाण्याच्य नादात बेफाम होऊन जाळ्यात फसतात ना( याप्रमाणे दुर्निवार इंद्रियांच्या वेदनेला वश झालेले जीव मरणासन्निध नेणाऱ्या विषयाच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करीत असतात. अर्थात इंद्रियापासून होणाऱ्या संतापापेक्षा अधिक दु:ख देणारा संताप नाही. असा जबर संताप अग्नीपासून, शस्‍्त्रापासून व विषयापासूनही होत नाही. इंद्रियांचा ताप सहन करण्यास असमर्थ असलेले लोक विषयाकरिता अग्नीत जळून मरतील, शस्त्रघात सहन करतील, वेळेवर विषयाचय वेदना सहन करतील. माता, पिता, गुरु, जर विषयापासून पराङ्मुख करण्ाचा उपदेश करतात, पण तो त्यंना पटत नाही. जगात इंद्रियामुळेच दु:क प्रापत् होत आहे. ज्यांना अतींद्रिय ज्ञान आहे त्यांनाच निराकुलता प्रापत् होऊन ज्ञानानंदाचे सुख मिळते. जे इंद्रियाधीन आहेत ते स्वभावत: दु:खीच आहेत. तसे नसते तर त्यांची विषयाकडे प्रवृत्ती झाली नसती. ज्याचा शीतज्वर नाहीसा झाला त्याला गुलाबजलाचे सिंचन लागत नाही. ज्याचा नेत्ररोग नाहीसा झाला त्याला अंजन वगैरे घालावे लागत नाही. ज्याचा कर्णशूल मिटला त्याला कानात बकऱ्याचे मूत्र घालावे लागत नाही. ज्याचा व्रणाचा घाव मिटला त्याला मलमपट्टी लावाली लागत नाही. याचप्राणे ज्याची इंद्रियजनित वेदना नाहीशी झाली त्याची विषयाकडे प्रवृत्ती होत नाही. भूक लागल्याखेरीज बोजन कोण करील( तहानेशिवाय कोण पाणी पिईल( उष्णता वाटल्याखेरीज शीतपवन कोण इच्छील( थंडी वाटल्याखेरीज रुईचे व लोकरीचे कपडे कोण वापरील( ही सर्व विषयवेदना नाहीशी करण्याची साधने आहेत. यापासून थोडा वेळ वेन्दना कमी झाली म्हजे अज्ञानी जीव आपणाला सुख झाले असे मानतो, परंतु हे खरे सुख नव्हे. खरे सुख म्हणजे जेथे वेदना मुळीच उत्पन्न होणार नाही ते अनाकुल व स्वाधीन अनंतज्ञान हेच खरे सुख, दुसरे नव्हे, याची पूर्ण जाणीव करू न ग्यावी म्णजे वरील सर्व दु:खापासून सुटका होईल.

यापुढे श्रावकाने मैत्रादिकि चार बावनांचा विचार करावा. एकेंद्रियादिक सर्व प्राण्याविषयी मैत्रीभावनेचे चिंतन करावे. कोणत्याही जीवाला दु:ख प्राप्त होऊ नये अशी इच्छा ठेवणे याला

मैत्रीभावना म्हणतात. जे सम्यग्रदर्शन, ज्ञान, चारित्र व तप इत्यादि गुणांनी आपणाहून अधिक असतील त्यांना पाहून हर्ष करणे याला प्रमोदभावना ्हणतात. प्रमोद म्हणजे हर्ष किंवा आनंद आपणाहून ज्यांच्या ठिकाणी गुण अधिक असतील त्यांना पाहून द्रव्यनिधी सापडल्याने आनंद होतो. तसा आनंद उत्पन्न झाला पाहिजे. गुणवंताला पाहताच अंगावर आनंदाचे रोमांच उभे होणे, मुख प्रसन्न होऊन नेत्र प्रफुल्लित होणे, ह्रदयातील आल्हादाने स्तुती, भाषण, नामकीर्तनादिकांच्या यगाने भ ती प्रगट करणे याला प्रमोदभावना म्हणतात. असाता वेदनीयकर्‍ाच्या उदयामुळे रोगदारिद्र्याने पीडित असतील त्यांचे व इंद्रियाने विकल असे आंधळे, बरिहे, पांगळे, लंगडे, दीन, अनाथ, परदेसी, अतिवृद्ध, बाल विधवा इत्यादि दु:खित प्राण्यांचे दु:ख नाहीसे करण्याचा अभिप्राय ठेवणे याला कारुण्यभावना म्हणतात. जे धर्मरहित, तीव्र क,ायी, हठग्राही, उपदेश देण्यास अयोग्य, विपरीत ज्ञानी, धर्मद्रोही, दुष्टाभिप्रयी व निर्दयी असतील त्याविषयी रागद्वेषाचा अभावरू पी परिणाम ठेवणे यास माध्यस्थ भावना म्हणतात.

भावार्थ - सर्व जीवांनी दु:ख होऊ नये असा विचार मनात असणे ही मैत्रीभावना होय. आपणाहून गुणांनी अधिक असलेल्या पुरुषांना पाहून अथवा अशांचे गुणश्रवण करू न अतिशय आनंद उत्पन्न होणे ही`प्रमोदभावना होय. दु:खितांना पाहून उपकार करावा अशी बुद्धी उत्पन्न होणे ही कारुण्यभावना व हठग्राही, निर्दयी व अभिमानी असतील त्याविषय रागद्वेषरहित परिणाम ही माध्यस्थभावना होय. धर्मधारक पुरुषांनी याचे सदैव चिंतन करावे.

याशिवाय गृहस्थाने जगाचा स्वभाव व शरीराच्या स्वभावाचे चिंतन करावे. जगाच्या स्वबावाचा विचार केल्यानेसंसारपरिभ्रमणाचे भय उत्पन्न होते व देहाचा स्वभाव चिंतिल्याने रागभावाचा अभाव होतो. हे जग अथवा लोक अनादि-निधन असून एक मृदंगावर दुसरे अर्धे मृदंग ठेवले असता जसा आकार होतो त्या आकाराचे आहे. हा लोक चौदा राजू उंच व दक्षिणोत्तर सर्वत्र सात राजू व वर क्रमाने कमी कमी असता सात राजू उंचीवर एक राजू रुंद आहे. पुन: वर क्रमाने वाढ त वाढ त साडे दहा राजू उंचीवर पाच राजू रुंद झालेला असून पुन: तेथून क्रमश: कमी कमी होत चौदा राजू उंचीवर लोकाच्या अंतभागी एक राजू रुंद आहे. याप्रमाणे पूर्व व पश्चिमेला क्रमाने कमी जास्त उंची आहे. अशा आकाराला धारण करणाऱ्या लोकाचा एक राजू रुंद, एक राजू लांब व एक राजू उंच आहे अशी कल्पना केली तर त्याचे तीनशे त्रेचाळीस तुकडे होतील. या लोकरू पी क्षेत्रात अनंतानंत काल परिभ्रमण करीत आपला काल निघून गेला. कोणताही पुद्गल परमाणू लोकात शिल्लक उरलेला नाही की जो आता जीवाला धारण करावयाला राहिला असेल. तीनसे त्रेचाळीस राजूप्रमाण क्षेत्रात असा एकही प्रदेश बाकी राहिला नाही की ज्याठिकाणी अनंत वेला या जीवाने जनममरण प्राप्त करू न गेतले नाही.

उत्सर्पिणी व अवसर्पिणी कालाच्या वीस कोडाकोडी सागरामध्ये कालाचा एकही असा समय उरला नाही की, ज्याकाली या जीवाने जन्ममरण केले नाही. नरक, तिर्यंच, मनुष्य, देव या चार गतीत जघन्य आयूपासुन उत्कृ्ट समयोत्तर असा कोणताही पर्याय बाकी राहिला नाही जो अनंत वेळा याला प्राप्त झाला नाही. ज्ञानावरणादि सर्व कर्मांचा बंध होण्यायोग्य जघन्यस्थिती अंत: कोडाकोडि सागरप्रमाण आहे व उत्कृष्ट स्थिती ज्ञानावरण, दर्शनावरण, वेदनीय व अंतराय या चार कर्माची तीस कोडाकोडी सागर प्रमाण आहे. मोहनीयकर्माची उत्कृष्ट स्थिती सत्तर कोडाकोडी सागर आहे. नामकर्म व गोत्रकर्माची उत्कृष्ट स्थिती वीस कोडाकोडी सागराची आहे. आयुकर्माची उत्कृष्ट स्थिती तेहतीस सागराची आहे. याप्रमाणे जघन्यस्थितीपासून समयसमयांच्या उत्कृष्ट स्थितीवृद्धीपर्यंत कर्मांची जी स्थिती आहे त्या सर्व स्थितीच्या एकेका स्थानाला असंख्यात लोकप्रमाण कषायाचे स्तान कारण आहे. ते कषायाचे एकेक स्थान अनंतवार जीवाला प्राप्त झालेले आहे. म्हणून अशा परिभ्रमणरूप जगात जीव नाना भेदरूप चतुर्गतीत परिभ्रमण करीत निरंतर दु:ख भोगून राहिला आहे. कोणताही जीव निश्चल नाही. पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणे त्ाचे जीवन चंचल आहे. भोगसंपदा आकाशातील ढगाप्राणे विनाशी आहे. राज्या, धन, ऐश्वर्य हे इंद्रधनुष्याप्रमाणे क्षणभंगुर आहे. अशा संसारात हा प्राणी अनंतानंत परिवर्तन करीत आहे. असे संसाराचे खरे स्वरूप चिंतन करण्याने संसारपरिभ्रमणाचे भय उत्पन्न होते.

शरीराचे चिंतन असे करावयाचे की, हे मनुष्यशरीर रोगरूपसर्पाचे बीळ आहे. हे अनित्य आहे. दु:खाचे कारण आहे. अपवित्र व नि:सार असून अनेक प्रयत्न करीत असूनही नाहीस होऊन जाणारे आहे. याला जसे धुवावे तसे यातून अधिक मल निघत असतो. याला पौष्टिक पदार्थ चारीत असूनही हे बलिष्ठ होत नाही. सुगंधी अत्तरे वगैरे लावीत असूनही दुर्गंध येत असतो. सुखात ठेवूनही हे तसे राहत नाही. अनेक वस्त्रालंकारांनी शोभवीत असूनही प्रतिदिवशी कुरूप होत जाते, सुंदर ठेवण्याचा प्रयत्न रात्रंदिवस करीत असूनही हे भयानक दिसू लागते, सुख देता देता दु:खी होते, अनेक प्रकारच्या मंत्रोपचारांनी याचे भय नाहीसे होत नाही, दीक्षा धारण करूनही साधुमार्ग दूषित करते, रात्रंदिवस गुणग्रहण करण्याचे शिक्षण देत असूनही हे गुणामध्ये रममाण होत नाही, निरंतर दु:क भोगीत असूनही कषायाचा उपशम करू शकत नाही, नको नको म्हणत असताही हे पापाकडे प्रवृत्त होते. प्रेरणा करीत्सूनही धर्म दारण करीत नाही, मर्दन करीत असूनही कठोर बनत जाते, रूक्ष ठेवण्याचा प्रयत्न करूनही ओले होते, सुगंधित तेल वगैरे माखीत असूनही दुर्गन्ध टाकीत नाही, चंदनादिकांनी सिंचन करीत असूनही पित्तप्रकोपाने जळत राहते. शोषणोपचार करीत असूनही तोंडातून कफ बाहेर टाकते, शरीर स्वच्छ ठेवीत

असताही कोडादिक रोग प्राप्त होतात, चामड्याने वे्टिले आहे तरी क्षीण होत चालले आहे. रात्रंदिवस सांभाळूनही अखेर कालाच्या मुखात जाऊन पडते, असा शरीराचा स्वभाव आहे. त्यावरल प्रेम नाहीसे होते म्हणून जगाचा व शरीराचा स्वभाव, संवेग म्हणजे संसाराची भीती उत्पन्न होण्याकरिता व वैराग्य उत्पनन होण्याकरिता चिंतीत असावे.

षोडशकारण भावना

याचप्रमाणे षोडशकारण भावनांचेही श्रावकांनी चिंतन करावे. याच्या चिंतनाने, अव्रतसम्यग्दृष्टीलाही तीर्तंकर प्रकृतीचा बंध होतो. तसाच देशव्रती श्रावकाला, प्रमत्तसंयतांना व अप्रमत्तसंयतांनाही होतो. याहून अधिक श्रेष्ठ पुण्यप्रकृती त्रैलोक्यात दुसरी नाही.

गोम्मटसारात याविषयी असे सांगितले आहे -

तित्थयरबंधपारंभया णरा केवलिदुगंते।। १।।

अर्थ - तीर्थंकर प्रकृतीच्या बंधाचा प्रारंभ कर्मभूमीच्या पुरुषलिंगधारी मनुष्यालाच होतो, अन्य तीन गतीत या प्रकृतीचा आरंभ होत नाही. तसेच केवली व श्रुतकेवलीच्या चरणकमलाजवळच तो होतो, केवली व श्रुतकेवलीच्या सान्निध्यावाचून अन्यत्र तीर्थंकर प्रकृतीच्या बंधाला योग्य अशी परिणामशुद्धी होऊ शकत नाही. हा तीर्थंकर प्रक-तीचा बंध प्रथमोपशम सम्यक्त्व, द्वितीयोपशम सम्यक्त्व, क्षायोपशमिक आणि क्षायिक सम्यक्त्व या चार सम्यक्त्वांपैकी कोणत्याही एका सम्यक्त्वात होतो.

तीर्थंकर प्रकृतीचा बंध होम्यास षोडशकारण भावना कारण आहेत. या भावना सर्व पापांचा नाश करतात. परिणामांची अशुद्धता नष्ट करतात. याचे श्रवण व पठण करणाऱ्यांच्या संसाराचा नाश करतात म्हणून यांचे निरंतर चिंतन करावे.

षोडशभावनांच्या सोळा जयमालांचा अर्थ समजून घेऊन भक्तिपूर्वक त्याचे पठण केल्याने महान् पुण्य प्राप्त करून घेता येते. परिणामांच्या विशुद्धतेसाठी त्याचा सव्स्तर अर्थ यापुढे देत आहोत -

हे संरार समुद्रातून तारून नेणाऱ्या, कुगतीचे निवारण करणाऱ्या, तीर्थंकर पदवीला प्राप्त करून देणाऱ्या, निर्वाण पदाला पोहोचविणाऱ्या, षोडशकारणा, मी तुला नमस्कार करून तुझे स्तवन करतो.

जो तीर्थंकर होणार आहे त्याला षोडकारण भावना होतात असा नियम आहे. त्याची कुगती संपली व तो संसारसमुद्रातून पार पडला( विदेहक्षेत्रात कित्येक जीवांना गृहस्थाश्रमात असताना केवली इ श्रुतकेवलींच्या जवळ षोडशकारणभावनांचे चिंतन केल्याने त्याच जन्मात देवाकडून त्यांचे तप:कल्याण, ज्ञानकल्याणक व निर्वाणकल्याणक केले जाते व ते मोक्षाला जातात. कित्येक पूर्वजन्मी केवली - श्रुतकेवलीपाशी षोडशकारणभावनांचे चिंतन केल्याने त्याच जन्मात देवाकडून त्यांचे तप:कल्याणक, ज्ञानकल्याणक व निर्वाणकल्याणक केले जाते व ते मोक्षाला जातात. कित्येक पूर्वजन्मी केवली-श्रुतकेवलीपाशी षोडशकारणभावनाचे चिंतन करून सौधर्मस्वर्ग आदि सर्वार्थसिद्धीत अहमिंद्रपर्यंत जन्म घेतात व तीर्थंकर होऊन निर्वाण पावतात. कित्येकांनी पूर्वजन्मी मिथ्याश्रद्धान करून नरकगतीचा बंध केला, पुढे केवली श्रुतकेवलींच्या आश्रयाने सम्यक्त्व ग्रहण करून षोडशकारण भावनांचे चिंतन केले तरी पूर्वेपापामुले झालेल्या गतिबंधामुळे त्याला नरकाला जावे लागते. तरी नरकातून निघून तीर्तंकर होऊन मोक्षाला जातात. पूर्वजन्मी षोडशभावनांच्या योगाने जे तीर्थंकरप्रकृती बांधतात त्यास पाच कल्याणकांचा महिमा प्रापत् होतो आणि जे विदेहक्षेत्रात गृस्थपणामध्ये तीर्थंकर प्रकृती बांधतात ते त्याच जन्मात तप, ज्ञान आणि निर्वाण अशांततीने कल्याणके भोगून मोक्षाला जातात. कित्येक विदेह क्षेत्रात मुनीची व्रते घेऊन केवली, श्रुतकवलीपाशी षोडशकारण भावनांचे चिंतन करून त्याच जन्मात तीर्थंकर होऊन त्रान आणि निर्वाण अशी दोन कल्याणके भोगून मोक्षाला जातात. कारण तप:कल्याणक त्याचे आधीन होऊन गेले असल्यामुळे पुन: होत नाही. ज्यांना तीर्थंकर प्रकृतीचा बंध पडला ते भवनत्रिक देवामध्ये, कुमनुष्य - तिर्यंचामध्ये, भोगभूमीमध्ये - स्त्री, नपुंसक, एकेंद्रिय, विकल चतुष्कादि भवामध्ये उत्पन्न होत नाहीत. तसेच तिसऱ्या नरकाच्या खाली जन्म घेत नाहीत. म्हणून षोडशकारणभावना कुगतीचे निवारण करणारी आहे. इतकेच नव्हे तर षोडशकारणभावना झाल्यानंतर तिसऱ्या जन्मात निर्वाण प्राप्त होतोच. म्णून ती मोक्षाला कारण आहे असे म्हटले आहे, अशा षोडशकारणभावनांना नमस्कार करून त्यंचे वर्ण करतो.

१) हे भव्य जीवहो, दुर्लभ मनुष्यजन्म तुम्हास प्रापत् झाला आहे, सबब तुम्ही पंचवीस दोष टाळून दर्शनविशुद्धी नांवाच्या बावनांचे चिंतन करा. सम्यग्दर्शनाला नाहीसे करणारे तीन मूढता, आठ मद, सहा अनायतने आणि शंकादि आठ दोष मिळून जे पंचवीस दोष आहेत त्यांचा त्याग करा म्हणजे तुमचे सम्यग्दर्शन अतिशय निर्मळ होईल. ही दर्शनविशुद्धिभावना होय.

२) विनयसंपन्नता म्हणजे पाच प्रकारचा विनय यथायोग्य पाळणे, हे पाच भेद सर्वज्ञ प्रभूंनी परमागमामध्ये सांगितले आहेत. दर्शनविनय, ज्ञानविनय, चारित्रविनय, तपोविनय आणि उपचारविनय, हा पाच प्रकारचा विनय जिनशासनाचे मूळ आहे. जेथे हा पाच प्रकारचा विनय

नाही, तेथे जिनधर्माची प्रवृत्तीच नाही म्हणून जिनेंद्रदेवांनी ह्याला जिनशासनाचे मूळ असे म्हटले आहे. जेथे हा पाच प्रकारचा विनय नाही, तेथे जिनधर्माची प्रवृत्तीच नाही म्हणून जिनेंद्रदेवांनी ह्याला जिनशासनाचे मूळ असे म्हटले आहे. ही विनयसंपन्नता भावना होय.

३) अतिचाररहित शील पालन करा. शील मलिन होऊ देऊ नका. निर्मळ शील मोक्षाच्या मार्गात मोठे सहाय्यकारी आहे. ज्याचे शील निर्मळ आहे त्याला इंद्रियविषय आणि कषायपरिग्रहादिक मोक्षमार्गामध्ये विघ्न करू शकत नाहीत. ही शीलव्रतेषु अनतिचार भावना होय.

४) दुर्लभ मनुष्यजन्मामध्ये ज्ञानाभ्यासातच मन गुंतवून ठेवा, सम्यग्ज्ञानाशिवाय एक क्षण देखील फुकट घालवू नका. अन्य संकल्प विकल्प संसारात बुडविणारे समजून त्यांचा त्याग करा. ही अभीक्ष्ण ज्ञानोपयोग भावना होय.

५) धर्मावर प्रीती ठेवून संसारातील शरीरसंबंधी भोगापासून विरक्त होऊन संवेगभावना अंत:करणात चिंतीत रहा. ह्यापासून संपूर्ण विषयावरील प्रीती नाहीशी होऊन धर्मामध्ये आणि धर्माच्या फलामध्ये प्रवृत्ती दृढ होईल. ही संवेग भावना होय.

६) आत्म्याचा घात करणारे लोभादिक चार कषाय आहेत त्यांचा त्याग करा आणि आपल्या शक्तीप्रमाणे सुपात्राच्या गुणामध्ये प्रीती ठेवून त्यास आहारादिक चार प्रकारचे दान देण्यामध्ये उद्युक्त असा. ही शिकततस्त्यागभावना आहे.

७) अंतरंग आणि बहिरंग अशा दो प्रकारच्या परिग्रहावरील आसक्ती सोडा आणि संपूर्ण विषयाची इच्छा नाहीशी करून आपल्या शक्तीप्रमाणे तपश्चरण करा ही शक्तितस्त्यागभावना होय.

८) अत:करणातील रागदिक विकार आणि इंद्रियविषय सोडून देऊन परम वीतरागतारूप साधुसमाधि धारण करा. साधुपुरुषावर संकट येईल त्यावेळी ते दूर करण्याचा प्रयत्न करा. ही साधुसमाधि भावना होय.

९) दहा प्रकारचे वैय्यावृत्त्य होय.

१०) अरिहंताच्या गुणामध्ये भक्ती ठेवून त्यांच्या नामादिकांचे ध्यान करा ही अर्हंतभ्कित भावना होय.

११) जे पाच प्रकारच्या आचाराचे सवत: आचरण करू न इतर शिष्याकडून तसे आचरण करवितात, आणि दीक्षा, शिक्षा देण्यामधये निपुण असतात अशा धर्माचे आधाररू प स्तंभासारखे या आचार्य परममे,ठीच्या गुणावर अंत:करणपूर्वक प्रीती ठेवा ही आचार्यभक्ति त भावना होय.

१२) ज्ञानामध्येप्रवृत्ती करविणारे, निरंतर सम्यग्ज्ञानाचे पठण स्वत:करू न अन्य शिष्यांना शिकविण्यामद्ये तत्पर, चार ही अनुयोगाच्या सास्त्रामध्ये पारंगत आणि अंगपूर्वादि श्रुतज्ञानाचे धारक असे जे उपाध्याय परमेष्ठी त्यांच्याविषयी भक्ती ठेवणे यास बहुश्रुतभक्ति त भावना म्हणतात.

१३) जिनशासनाला पुष्ट करणारा, संशयादिक अंधकाराला दूर करू न सूर्याप्रमाणे ज्ञानाचा प्रकाश देणारा असा जो सर्वज्ञप्रणीत अनेकांतात्मक आगम, तो शिकण्यामध्ये, ऐकण्यामध्ये, चिंतन करण्यामध्ये भक्ती ठेवणे ह्यास प्रवचनभक्ति त भावना म्हणतात.

१४) करण्यायोग्य सह आवश्यक क्रिया आहेत. त्या अशुभ कर्माच्या आस्रवाला रोकून कर्माची निर्जरा करणाऱ्या आहेत. अशरणाला शरण आहेत. त्यावेळच्या वेळी करणे यास आवश्यकापरिहाणि भावना म्हणतात.

१५) लोकांमध्ये पसरलेले अज्ञान नाहीसे करू न विद्वत्तेच्या आणि शुद्ध आचरणाच्या प्रभावाने जिनमार्गाचे माहात्म्य प्रकट करणे ह्यास मार्गप्रभावना म्हणतात. मार्गप्रभावनेपासून अनेक पुरुषांची वीतरागधर्मामद्ये प्रवृत्ती होते आणि कुमार्गाचा अभाव होतो.

१६) धर्मामध्ये, धर्मात्मा पुरुषांमध्ये, धर्माच्या आयतनामध्ये आणि परमागमाच्या अनेकांतरू प वाक्यामध्ये, अत्यंत प्रीती करणे यास वात्सल्यभावना म्हणतात. ह्या वात्सल्य अंगोपासून दुर्धर मोह व मान यांचा नाश होतो.

ह्याप्रमाणे निर्वाणसुखाला देणाऱ्या ह्या सोळा भावनांचे जो भव्यजीव स्थिर चित्त ठेवून चिंतन करतो, व ज्याच्या आत्म्यामध्ये ह्या भावना अत्यंत उत्कट होऊन स्फुरण पावतात त्यालाच समस्त जीवांचे कल्याण करणारे तीर्थंकरपद प्राप्त होते व तो पंचमगती प्राप्त करू न घतो. असे ह्या सोळा भावनांचे संक्षिप्त स्वरू प सांगितले. आता प्रत्येक भावनेचे तपशीलवार वर्ण करतो.

## दर्शनविशुद्धि व तिच्या अंगाचे स्वरू प

हे भव्यजीवहो, हा मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे तो सफल व्हावा अशी इच्छा असल्यास सम्यग्दर्शनाची शुद्धी करा. हे सम्यग्दर्शन संपूर्म धर्माचे मूळ आहे. सम्यक्त्वावाचून श्रावकर्धम होऊ शकत नाही. सम्यग्दर्शनावाचून ज्ञान आहे ते कुज्ञान आहे, चारित्र असल्यास कुचारित्र आहे

आणि तप असेल तर ते कुतप आहे. सम्यग्दर्शनावाचून या जीवनाने अनंतानंत काल परिभ्रमण केले आहे. तेव्हा आता जर या चतुर्गतिरूपी संसारपरिभ्रमणापासून सुटावे, जनम, जरा, मरणापासून मोकळे व्हावे, आणि अनंत अविनाशी अशा आत्मसुखाचा लाभ मिळावा असे वाटत असेल तर अन्य समस्त परद्रव्यांवरील अभिलाषा सोडून सम्यग्दर्शनाची शुद्धी करा. ह्या दर्शनविशुद्धीपासून दुर्गतीचा नाश होऊन निर्वाणसुख प्राप्त होते. विनयसंपन्नातादिक ज्या पंढरा भावना आहेत त्या सर्वामचे मूळ ही दर्शनविशुद्धि भावनाच आहे. ही नसेल तर बाकीच्या पंधरा भावना होणारच नाहीत. म्हमून ही भावना संसारदु:खरूपी अंधकाराचा नाश करमअयास सूर्यासारकी आहे. भव्य जीवाला परम शरण आहे. ज्यायोगाने स्वपरद्रव्यातील भेदविज्ञान स्पष्ट होईल असा यत्न करा. हा जीव अनादि कालच्या मिथ्यात्वकर्माला वस झाल्याने त्याला, आपण कोण आणि पर कोण याची ओलख झाली नाही. जेजे शरीर कर्माच्या उदयाने प्राप्त झाले त्या त्या शरीरालाच आपले स्वरूप समजूत तो आपले खरे स्वरूप विसरला. देव कोण, कुदेव कोण, धर्म काय, अधर्म काय, सुगुरु कोण, कुगुरु कोण हे समजेनासे झाले. तसेच पुण्य, पाप, इहलोक, परलोक हेही कळेना. ग्रहण काय करावे, त्ाग कशाचा करावा, खावे कोणते, खाऊ नये कोणते, सोबत कोणाची असावी, कोणाची नसावी, शास्त्र कोणते मानावे, कोणते टाळावे, ह्याविषयी विचार नाहीसा झाला आणि कर्माच्या उदयाने जे सुख दु:ख भोगावे लागले त्यातच एकरूप होत्साता आपले हित अहित न ओळखता परद्रव्यातच निमग्न झाला आहे. त्यामुले त्याला सदैव दु:ख होत आहे. काललब्धीच्या प्रभावाने उत्तम कुलात जन्म होऊन मला जिनधर्म प्राप्त झाला आहे. त्यामुले वीतराग सर्वज्ञाच्या अनेकांतरूप परमागमाच्या प्रसादाने प्रमाण नर्यानेक्षेपांनी परीक्षा करून निर्णय करण्यची शक्ति आली आह, शरीरादिक परद्रव्यपासून वेगळा असे अखं अविनाशी चैतन्य लक्षणांनी युक्त व (ज्ञाता) जाणणारा असा मीच एक आम्ता आहे. शरीर, जाति, कुल, रूप, नावे इत्यादिक मजपासून अगदी भिन्न आहेत. राग, द्वेष, काम, क्रोध, मद, लोभादिक हे कर्माच्या उदयाने उत्पन्न होतात. ते माझ्या ज्ञायक स्वभावामध्ये विकार आहेत. जसा स्फटिकमणि मूळचा शुभ्र निर्मल स्वभावाचा असतो परंतु डाकाच्या संसर्गाने काळा, पिवळा, हिरवा, लाल असा अनेक रंगाचा दिसू लागतो, तसा आत्मा हा स्वच्छ, ज्ञायक, निर्विकारस्वरूप असून मोहकनीजनित रागद्वेषादि विकार यामध्ये झळकतात, ते माझे स्वरूप नसून पर आहेत. ऱसा आपल्या स्वरूपाचा निश्चय करावा व खऱ्या देवगुरुशास्त्राचे स्वरूप मनात आणावे.

सर्वज्ञ, वीतराग, परमहितोपदेशक असा व क्षुधा, तृषा, जन्म, जरा, मरण, रोग, शोक, भय, विस्मय, राग, द्वेष निद्रा, स्वेद, मद, मोह, चिंता, खेद, अरति असे अठरा दोष ज्याचे अगदी नाहीसे झाले, अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनंत वीर्य, अनंत सुख इत्यादि आत्मिक अविनाशी

अनंत गुण ज्याच्यामध्ये प्रकट झाले, तोच आप्त आम्होला वंतन स्तवन पूजन करण्याला योग्य आहे. अन्य कामी, क्रोधी, लोभी, मोही, स्त्रीमध्ये आसक्ती धारण करणारा, जो कर्माच्या स्वाधीन झालेला, सर्वज्ञातारहित, केवळ इंद्रीयजन्य ज्ञानाचाच धारक, तो मला स्तवन पूजन नमस्कारास योग्य नाही. जो चोरांचा व जारांचा शिरोमणी आहे अशाचे आराधन केल्याने काय हित होणार( तसेच जे शास्त्र स्र्वज्ञ वीतरागाने उपदेशिलेले आहे, ज्यात प्रत्यक्षा अनुमानाकिांनी कोठेही बाधा येत नाही, ज्यामध्ये संपूर्ण सहा काय जीवांच्या हिंसेचा निषेध केला आहे, आणि आत्म्याचा उद्धार होण्याचा उपाय आहे, वस्तूचे अनेकांत स्वरूप साक्षात् ज्यात दाखविले आहे. तेच शास्त्र आगम होय. आणि तेच शास्त्र शिकण्यास, शिकविण्यास, ऐकण्यास, श्रद्धान करण्यास आणि नमस्कर करण्यास योग्य आहे. या उलट जे शास्त्र रोग, द्वेषी `अशांनी `प्ररूपण केलेले, ज्यापासून विषयवासना व कषाय वाढतात व ज्सा हिंसा करण्याचा उपदेश केलेला असतो, जे प्रत्यक्षा अनुमानादिकांनी बांधित व एकांतरूप आहे, ते शिकण्यास ऐकण्यास किंवा नमस्कार करण्यास योग्य नाही. तसेच ज्यांची विषयवांछा मावळली आहे, कषाय ज्यांचे अत्यंत मंद झाले आहेत, आरंभ आणि परिग्रहाचा ज्यांनी त्याग केला आहे, जे केवळ आत्म्याची उज्ज्वलता करणयातच ुद्युक्त असून ध्यानस्वाध्यायामध्ये लीन आहेत, कर्माच्या उदयामुळे उत्पन्न जालेल्या सुखदु:खामध्ये साम्यभाव धारण करतात, जीवन, मरण, लाभ, अलाभ स्तवन, निंदा वगैरेमध्ये रागद्वेषरहित असतात, उपसर्ग आणि परीषह सहन करण्यामध्ये अकंप होत्साते धैर्य धारण करतात, असे परम निर्ग्रंथ दिगंबर गुरूच वंदन व स्तवन करण्यास योग्य आहेत. आरंभी, कषायी, विषयानुरागी असे कुगुरू स्तवन वंदन करण्यास योग्य नाहीत. प्राणिमात्रावर दया हाच धर्म आहे, हिंसा करणे हा केव्हाही धर्म होणार नाही, जरी सूर्य पूर्वेचा पश्चिमेस उगवला, अग्नी शीत झाल, सर्पाच्या तोडात अमृत झाले, मेरू देखील चलायमान झाला आणि पृथ्वी उलथीपालथी झाली तरी हिंसेमध्ये धर्म कधीही होणार नाही असे दृढ श्रद्धा सम्यग्दृष्टीला असते. ज्याला आपल्या आत्म्याच्या अनुभवामध्ये, सर्वज्ञ वीतरागरूप आप्ताच्या स्वरूपामध्ये, निर्ग्रंथ विषयकषायरहित गुरूमध्ये, अनेकांत स्वरूप आगामामध्ये आणि दयारूप धर्मामध्ये शंका राहात नाही त्याला नि:शंकित अंग आहे असे समजावे.

तसेच जो सम्यग्दृ्टी आहे तो धर्मसेवनापासून विषयसुखाचे फळ इच्छीत नाही. कारण सम्यग्दृष्टीला इंद्र, अहमिंद्र लोकांचे विषय देखील महावेदनारूप, विनाशिक आणि पापाचे बीज असेच दिसत असतात आणि धर्माचे फल अनंत, अविनाशी, स्वाधीन, सुखाने युक्त असे मोक्षाच दिसत असत, म्हणून जसे बहुत मोलाचे रत्न सोडून काचेचा तुकडा जोहरी ग्रहण करीत नाही, तसे ज्याला खरे आत्मिक, अविनाशी व निराबाध सूख समजले. तो खोट्या आणि दु:खमय अशा

विषयसुखाची वांछा कशाला करील( ह्यासाठी सम्यग्दृष्टी जीव वांछारहितच असतो, आणि जो अव्रती सम्यगृष्टी आहे त्याला वर्तमानकाळी आपल्या उपजीविका वगैरेमध्ये आणि स्थान परिग्रहादिकामध्ये, वेदना नाहीशा व्हाव्यात म्हणून जी वांछा होते ती वर्तमानकाळच्या वेदना सहन करण्याचे सामर्थ्य नसल्यामुले होत असते. तो वेदनांचा इलाज फक्त इच्छीत असतो. जसे रोगी मनुष्याला कडू औषध नकोसे वाटते असते तथापि, दु:खाच्या वेदना सहन होत नाहीत म्हणून कडू औषध उलटी होण्यासारखे असले तरी तो ते ग्रहण करतो, त्याला इंद्रियांचे विषय भोगण्याची बिलकुल आवड नसते. तसे सम्यग्दृष्टी हा निर्वांछक आहे. तथापि वर्तमानकालाचे दु:ख मिटण्यासाठी विषयाची इच्छा करतो. अप्रत्याख्यानावरण कर्माच्या उदयाच्या अभावाने ज्याने व्रतग्रहण केले असेल तो कसेही संकट आले तरी विषयाची इच्छा करीतच नाही. ह्यावरून सम्यग्दृ्टीला नि:कांक्षित गुण असतोच ह्यात शंका नाही.

सम्यग्दृष्टि जीवाला अशुभ कर्माच्या उदयाने मनाला न आवडणारी सामग्री प्राप्त झाली तर तो त्याविषयी मनात किळस करीत नाही व आपले परिणाम बिघडू देत नाही. तो असा विचार करतो की, मी पूर्वी जसे कर्म बांधले आहे त्याला अनुसरूनच मला भोजन, पान, स्त्री, पुत्र, दारिद्र्य, संपदा, आपदा वगैरे प्रापत् झाले आहे. तसेच तो अन्य कोणी रोगी, दरिद्री, हीन, नीच, मलिन वगैरेना पाहून मनात किळस आणीत नाही, ते पापाचे फळ आहे समजून तो त्याचा तिरस्कार करीत नाही, तसेच मलमूत्र चिखल वगैरे पदार्थाला पा८हून, भयंकर अशा स्मशान, वन, डोंगर वगैरे जागा पाहून, भयरूप दु:खदायी अशा काळाला पाहून, आणि दुष्टपणा वगैरे वस्तूच्या स्वभावाला पाहून आपल्या परिणामामातक लेश उत्पन्न न होऊ देणे, हे निर्विचिकित्साअंग सम्यग्दृष्टीला असतेच.